# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | सोमवार । दि. ६ जुलै २०२६ । अंक ३० । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## आज रायगडमधील शाळांना सुट्टी

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने सोमवार, दि. ६ जुलै रोजी अतिमुसळधार ते अत्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार, तर काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाची •> पान २ वर

## सुभाषनगरमध्ये दरड कोसळली

**रायगड :** खोपोलीतील सुभाषनगर परिसरातील डोंगराचा काही भाग रविवारी सकाळी कोसळला. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, असाच पाऊस राहिल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे. सुभाषनगर हा डोंगराच्या पायथ्याशी वसलेला दाट लोकवस्तीचा भाग आहे. सुमारे तीन ते साडेतीन हजार नागरिक या परिसरात राहात आहेत. प्रत्येक पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका •> पान २ वर



# रायगडात जलप्रकोप!



। रायगड । प्रमोद जाधव । शनिवारपासून कोसळणाऱ्या पावसाचा रविवारीसुद्धा जोर कायम राहिल्याने रायगड जिल्ह्यात अक्षरशः जलप्रकोपाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अंबा, कुंडलिका आणि पाताळगंगा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, अनेक गावांमध्ये पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली असून, अनेक ठिकाणी घरे, गोठे आणि शेतीचे नुकसान झाले आहे. दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे शंभरहून अधिक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून, महावितरणलाही मोठा फटका बसल्याने हजारो ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. पालीच्या बल्लाळेश्वर मंदिरालाही पावसाचा फटका बसला असून, मंदिरात पाणी गेल्याने येणाऱ्या भाविकांचे हाल झाल्याचे दिसून आले. •> पान २ वर


- जिल्ह्यातील अंबा, कुंडलिका, पाताळगंगा नद्यांना पूर
- जनजीवन विस्कळीत, घरांची पडझड, महामार्ग ठप्प
- पशुधनाची हानी, दरडीच्या धोक्याने शेकडो नागरिकांचे स्थलांतर

• (छायाचित्र : समीर मालोदे)



## दिघी खाडीत बोट बुडाली; तिघांना वाचविण्यात यश

। चणेरा । प्रतिनिधी ।



दिघी खाडी परिसरात मासेमारीसाठी गेलेल्या तिघा मच्छिमारांची बोट (फायबर डिंगी) रविवारी जोरदार वाऱ्यामुळे पलटली. तिघेही समुद्रात पडून जीव वाचवण्यासाठी झुंज देत असतानाच दिघी-आगरदांडा मार्गावरील जंगल जेट्टी क्वीन बोटीचे चालक बाळकृष्ण गणेश पाटील यांनी प्रसंगावधान राखत धाडसी बचावकार्य केले. त्यामुळे तिन्ही मच्छिमारांचे प्राण वाचले.

हरिश्चंद्र भुणेशवर, कृष्णा पाटील आणि प्रकाश झेंगर (सर्व रा. दिघी) हे मासेमारीसाठी समुद्रात गेले असताना अचानक वाऱ्याचा वेग वाढल्याने त्यांची डिंगी उलटली. ही घटना लक्षात येताच बाळकृष्ण पाटील यांनी तातडीने बोट घटनास्थळी नेऊन तिघांनाही सुरक्षितपणे बाहेर काढत किनाऱ्यावर आणले. त्यांच्या तत्परता आणि धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली असून, परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## महामार्गाला पुराचा विळखा

### वाहनांच्या रांगा, प्रवाशांचे हाल

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला पुराचा विळखा बसला असून सुकेळी, नागोठणे आणि वाकण परिसरात महामार्गाच्या दोन्ही लेनवर कंबरभर पाणी साचल्याने वाहतूक अनेक तास ठप्प झाली. वाकणजवळ एक प्रवासी बस आणि पिकअप व्हॅन चिखलात अडकल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली. परिणामी, महामार्गावर तब्बल सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या.

वाहतूक कोंडीत लहान मुले, वयोवृद्ध, महिला आणि इतर प्रवाशांचे अन्न-पाण्याविना प्रचंड हाल झाले. अनेक खासगी वाहने, मालवाहू ट्रक तसेच एसटी बसही



(छायाचित्र : धम्मशील सावंत

महामार्गावर अडकून पडल्या. दरम्यान, महामार्ग पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या.

सततच्या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक सखल भागांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आणि पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून जाण्याचे धाडस करू नये, असे आवाहन केले आहे.

## पुरात अडकलेल्या २८ जणांचे रेस्क्यू



। पाली । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, रविवारी पालीवाकण राज्य महामार्गावरील वाकण आणि वजरोली परिसरात मोठी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली. पुराच्या पाण्यात अडकलेल्या तब्बल २८ नागरिकांची रेस्क्यू टीमने धाडसी मोहीम राबवत सुखरूप सुटका केली.

वजरोली गावाजवळ अंबा नदीकाठी सुरू असलेल्या बांधकामावरील २० मजूर अचानक वाढलेल्या पाण्यामुळे अडकून पडले. तर, वाकण नाक्याजवळील एका हॉटेलमध्ये पुराचा वेढा पडल्याने आठ जणांना जीव वाचवण्यासाठी •> पान२ वर

## नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील रोहा येथील कुंडलिका नदी इशारा पातळी ओलांडून वाहात आहे. या नदीची सध्याची पाणी पातळी २३.७० मीटर असून, इशारा पातळी २३ मीटर आणि धोका पातळी २३.९५ मीटर आहे. त्यामुळे नदी अवघ्या काही सेंटीमीटरवर धोका पातळी गाठण्याच्या स्थितीत आहे.



महाड येथील सावित्री नदीची इशारा पातळी ६ मीटर, तर धोका पातळी ६.५० मीटर आहे. सध्या नदीची पाणीपातळी ६.२० मीटर इतकी झाली असून, तिने इशारा पातळी ओलांडली आहे.

खालापूर येथील पाताळगंगा नदीची इशारा पातळी २०.५० मीटर, तर धोका पातळी २१.५२ मीटर आहे. सध्या नदीची पाणीपातळी २१.३० मीटर इतकी असून, तीही इशारा पातळीच्या पुढे वाहात आहे.

हवामान विभागाने पुढील काही तासांतही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला असून, पावसाचा जोर कायम राहिल्यास सावित्री, पाताळगंगा आणि कुंडलिका या नद्या धोका पातळी ओलांडण्याची शक्यता आहे.

## धबधबे, धरणांवर पर्यटनबंदी

### ३० ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील सर्व धबधबे, धरणे तसेच धोकादायक पर्यटनस्थळांवर ३० ऑगस्टपर्यंत पर्यटनबंदी लागू करण्यात आली आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.



पावसाळ्यात धबधबे, धरणे आणि खोल पाण्याच्या परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. मात्र, सेल्फी काढण्याच्या नादात, खोल पाण्यात उतरणे, धबधब्याच्या प्रवाहाखाली बसणे, मद्यप्राशन करणे, अशा प्रकारांमुळे दरवर्षी अपघात आणि जीवितहानीच्या घटना घडतात. यंदाही अतिवृष्टीमुळे पूरस्थिती, दरडी कोसळण्याचा धोका आणि पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रशासनाने सर्व पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना आदेशाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही दिला आहे. •> पान २ वर

## पूरग्रस्तांकडे पाठ; लोकप्रतिनिधी कार्यक्रमांत?



। पेण । प्रतिनिधी ।

रायगडजिल्ह्यातसुरूअसलेल्या मुसळधार पावसामुळे पेण तालुक्यात अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे. काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या असून, घरांसह मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

- नागरिकांकडून नाराजी व्यक्त
- पाहणी व मदतकार्याची अपेक्षा

पूरग्रस्त भागांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी करणे, नागरिकांना धीर देणे आणि प्रशासनाशी समन्वय साधून मदतकार्याला गती देणे अपेक्षित असताना, पेणचे आमदार तसेच काही जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य हे इतर कार्यक्रम आणि बैठकींमध्ये व्यस्त असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

संकटकाळात •> पान २ वर

## वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करा

### महामार्ग वाहतूक पथकाचे वाहनचालकांना आवाहन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे मुंबई-गोवा महामार्गावरील (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६) वाकण फाटा आणि सुकेळी खिंड परिसरात सुमारे अर्धा किलोमीटरपर्यंत पाणी साचले असून, वाहतुकीवर परिणाम झाला आहे. तसेच रोहा-अलिबाग मार्गावरील भिसे खिंड येथे दरड कोसळल्याने या मार्गावरही अडथळे निर्माण झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर गोव्याकडे जाणाऱ्या तसेच •> पान २ वर



• पाल्हे बायपास वाहतुकीस बंद

### प्रसूतीपश्चात कक्षात पीओपी कोसळला | प्रसूत महिला थोडक्यात बचावली

## जिल्हा रुग्णालयाचा निष्काळजीपणा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रसूती पश्चात काळजी कक्षात रविवारी सायंकाळी छतावरील पीओपीचा मोठा तुकडा थेट एका खाटेवर कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने त्या खाटेवरील प्रसूत महिलेला काही वेळापूर्वीच दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली. या घटनेमुळे जिल्हा रुग्णालयातील इमारतीच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.





माहितीनुसार, रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रसूती पश्चात काळजी कक्षात महिलांवर उपचार सुरू असताना अचानक छतावरील पीओपीचा मोठा भाग कोसळला. घटनेनंतर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

विशेष म्हणजे, जिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असतानाही अशा घटना वारंवार घडत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रुग्णालय प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत आहेत. याचवेळी रुग्णालयातील पुरुष शस्त्रक्रिया (मेल सर्जिकल) वॉर्डमध्येही स्लॅबचा काही भाग कोसळल्याची माहिती समोर आली आहे.

यापूर्वीही रुग्णालयात स्लॅब आणि पीओपी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, त्यानंतरही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर संबंधित विभागाने तातडीने इमारतीची संरचनात्मक तपासणी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रुग्णालयाच्या निष्काळजीपणाबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे.


## माथेरानमध्ये मुसळधार



• (छायाचित्र - संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

राज्यात मान्सून सक्रिय झाल्यानंतर माथेरानमध्ये मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गेल्या २४ तासांत तब्बल ४०८ मिमी पावसाची नोंद झाली असून, प्रसिद्ध शार्लोट तलाव तुडुंब भरून वाहू लागला आहे. पावसाचा जोर कायम असतानाही माथेरानमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. •> पान २ वर

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# अलिबाग बायपास गेला पाण्याखाली

■ चेंढरे ग्रामपंचायतीच्या नालेसफाईचा फज्जा

■ वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाने नागरिकांची त्रेधातिरपीट उडविली आहे. अलिबाग तालुक्यात पावसाने हाहाकार उडविला आहे. अलिबाग शहर परिसरात जणू सरोवर तयार झाले होते. अलिबाग शहराचे प्रवेशद्वार असणाऱ्या चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या परिसरात अनेक ठिकाणी पावसाचे पाणी घरांमधून घुसले होते. चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील अलिबाग बायपास यंदादेखील पावसाच्या पाण्याखाली गेला होता. या रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांना वाहने चालविण्यासाठी कसरत करावी लागली. अलिबाग बायपास परिसर आणि अलिबाग वडखळ मुख्य रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे चेंढरे ग्रामपंचायतीच्या नालेसफाईचा फज्जा उडाला असल्याचे चित्र पाहावयास मिळाले आहे.



चेंढरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच निलेश महाडिक यांनी यासंदर्भात चेंढरे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक आणि रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांना अनेकदा बायपासवर साचणारे पाण्याबाबत भ्रमणध्वनीवरून संपर्क करून जाणीव करून दिली होती. परंतु, प्रशासकीय यंत्रणांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र रविवारी अलिबाग बायपासवर पाहावयास मिळाले.

अलिबाग शहरात येण्यासाठी वडखळ-अलिबाग हा मुख्य मार्ग आहे. त्याचबरोबर अलिबागमधून रेवस, रोहा, मुरुड आणि वडखळ, मुंबईकडे जाण्यासाठी बायपास तयार करण्यात आला आहे. या बायपासवर गेले दोन-तीन वर्षांपासून पावसाचे पाणी साचून बायपास पाण्याखाली जाण्याचे प्रकार पावसाळ्यात घडत आहेत. याला या परिसरात होणारे शहरीकरणाचे बदल हे प्रमुख कारण समोर असले तरी या परिसरात दरवर्षी कागदावरची नालेसफाई याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. खरे तर, या परिसरात असणाऱ्या छोट्या नाल्यांवर काँक्रिटीकर असणाऱ्या मोऱ्या उभारायला हव्यात. मात्र, तसे होताना दिसत नाही. यामुळे या परिसरात पावसाचा जोर वाढला की लगेचच बायपास पाण्याखाली जातो.

गेले दोन वर्षे बायपासवर साचणारे पाणी मर्यादित परिसरात साचले जात होते. रविवारी झालेल्या पावसात बायपास पाण्याखाली जाऊन एचपी पेट्रोलपंप आणि रिलायन्स पेट्रोलपंपाच्या प्रवेशद्वारापर्यंत पाणी साचले होते. चेंढरे परिसरातील आनंदनगरमध्ये अनेक ठिकाणी बंगल्यांमध्ये पाणी घुसल्याची चर्चा ऐकावयास मिळाली. चेंढरे ग्रामपंचायतीने पावसाळ्यापूर्वीच्या नियोजनामध्ये नालेसफाईच्या कामांकडे लक्ष केंद्रित करून साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रयत्न केले तर नागरिकांना पाणी साचण्याची समस्येपासून सुटका मिळू शकते. याबाबत ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निलेश महाडिक यांनी वारंवार संपर्क करूनही त्यांनी दुर्लक्ष केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

# न्हावा शेवा पोलीस ठाण्यात शिरले पावसाचे पाणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरासह संपूर्ण तालुक्यात शनिवारी व रविवारी जोरदार पाऊस पडला. या पावसामुळे न्हावा शेवा पोलीस ठाण्यामध्ये पाणी शिरल्याने पोलीसांना कार्यालयीन कामकाज सोडून कार्यालयातून पाणी बाहेर काढण्याचे काम करावे लागले.उरण शहरात जोरदार पाऊस झाल्याने उरण न्यायालय, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय ठिकाणच्या मोकळ्या जागांत तलावसदृष परिस्थिती निर्माण असून वेश्वी, भेंडखळ,म्हातवली गावातील रहिवाशांच्या घरात पुराचे पाणी शिरले असल्याने रहिवाशांची एकच तारांबळ उडाली आहे.

उरण शहर आणि तालुक्याला शनिवारी व रविवारी पावसाने झोडपल्यामुळे शहर,जलमय झाले आणि नाल्यांसह रस्त्यावर पाणी वाहत होते.सदर जोरदार पावसामुळे अनेक ठिकाणचे रस्ते व मोकळ्या जागांत तलावसदृष परिस्थिती निर्माण झाली.या पावसामुळे जेएनपीए बंदर परिसरातील कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याला पाण्याने वेढला आणि सतत कोसळलेल्या पावसामुळे साचलेले पाणी चक्क पोलीस ठाण्याच्या इमारतीत शिरले. यामुळे पोलीस ठाण्याला ही तलावाचे स्वरुप प्राप्त झाले. ठाण्याच्या इमारतीत अचानक पाण्याचा लोंढाच आल्याने पोलीस कर्मचाऱ्यांची एकच तारांबळ उडाली. आता पाण्यात काम कसे करावे किंवा पाणी बाहेर तरी कसे काढावे हा प्रश्न समोर पडला आहे.

तालुक्यातील वेश्वी, भेंडखळ, म्हातवली गावातील रहिवाशांच्या घरात पुराचे पाणी शिरल्याने एकच तारांबळ उडाली असून रहिवाशांच्या घरातील जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले आहे.

# धोंडसे येथे दरड कोसळली

**। पाली । प्रतिनिधी ।**

मुसळधार पावसामुळे रविवारी (दि.५) सुधागड तालुक्यातील धोंडसे गाव ते स्मशानभूमी रस्त्यावर मोठी दरड कोसळल्याची घटना घडली आहे. या दरड कोसळण्याच्या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही, अशी माहिती पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी दिली.



जोरदार पावसाने धोंडसे गावाजवळील टेकडीवरून माती आणि दगडांचा मोठा ढिगारा थेट रस्त्यावर येऊन पडला. दरड कोसळल्याने रस्त्यावर असलेला विजेचा खांबही कोसळला आहे. विजेचा खांब कोसळल्यामुळे गावातील पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली असून पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.

या दरड कोसळलेल्या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या धोंडसे गावचे सरपंच आणि पोलीस पाटील घटनास्थळी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. रस्ता मोकळा करण्यासाठी आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

# गोदरेज प्रकल्पामुळे पावसाच्या पाण्याने घरांना वेढा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील गोदरेज वूड्स प्रकल्प परिसरात पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने स्थानिक रहिवाशांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक घरांना पाण्याने वेढा घातला असून, काही ठिकाणी एक ते दोन फूट पाणी साचल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

गोदरेज कंपनीने सुमारे १०१ एकर क्षेत्रात निवासी प्रकल्प उभारण्याचे काम सुरू केले आहे. मात्र, प्रकल्प उभारताना पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याचे पुरेसे नियोजन न केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी थेट घरांपर्यंत पोहोचत असून नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.



■ ड्रेनेजच्या नियोजनाअभावी रहिवाशांचे हाल

साचलेल्या पाण्यामुळे घरांच्या भिंतींमध्ये ओलावा निर्माण झाला असून, घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच साप व इतर सरपटणारे प्राणी घरात शिरण्याचा धोका वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मारुती हडप, सविता वाघमारे यांच्यासह स्थानिक रहिवाशांनी पावसाच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, घरांपर्यंत पाणी येणार नाही याची दक्षता घ्यावी आणि नागरिकांसाठी ये-जा करण्याचा मार्ग त्वरित खुला करावा, अशी मागणी केली आहे.

> “अतिरिक्त पावसामुळे सध्याची ड्रेनेज व्यवस्था अपुरी पडली आहे. त्यामुळे मोठ्या क्षमतेचे पाईप टाकण्यात येणार असून, साचलेले पाणी पंपाद्वारे बाहेर काढण्याचे काम सुरू केले जाईल. भविष्यात पाणी साचणार नाही आणि परिसरातील घरांचे नुकसान होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येतील.
> – अविनाश देशमुख, प्रकल्प व्यवस्थापक, गोदरेज”

# भिसे खिंडीत दरड कोसळली



**रोहा :** रोहा-नागोठणे मार्गावरील भिसे खिंडीत मुसळधार पावसामुळे महाकाय वृक्ष उन्मळून रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली. झाडासोबत दगड-मातीचा मलबाही रस्त्यावर आल्याने दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला. खबरदारीचा उपाय म्हणून तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांच्या सूचनेनुसार नागोठणे मार्गावरील वाहतूक दिवसभरासाठी बंद करण्यात आली. प्रशासनाने नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे तसेच अत्यावश्यक कामाशिवाय या मार्गावर प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

# सुकेळीत पूर, सहा तास वाहतूक ठप्प

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला बसला. रोहा तालुक्यातील सुकेळी खिंड आणि महाराष्ट्र सिमलेस जिंदाल कंपनीजवळ महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रविवारी पहाटेपासून सुमारे सहा तास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने शेकडो प्रवासी अडकून पडले.

सततच्या पावसामुळे डोंगरातील नाले तुडुंब भरून त्यांचे पाणी थेट महामार्गावर आल्याने पूरस्थिती निर्माण झाली. परिणामी मालवाहू ट्रक, एसटी बस, खासगी वाहने आणि अन्य वाहनांचा मोठा खोळंबा झाला.



परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नागोठणे व कोलाड पोलिसांनी भर पावसात घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पर्यायी मार्ग म्हणून महाराष्ट्र सिमलेस जिंदाल कंपनीच्या अंतर्गत रस्त्याचा वापर करून अडकलेली वाहने टप्प्या-टप्प्याने बाहेर काढण्यात आली. त्यामुळे अनेक तासांनंतर वाहतूक पूर्ववत झाली.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कंपनी परिसरातील नाल्यावर बसविण्यात आलेल्या लोखंडी जाळीत कचरा अडकल्याने पाण्याचा निचरा होत नाही. तसेच वाढते औद्योगिकीकरण, भराव आणि नैसर्गिक नाल्यांवरील अतिक्रमण यामुळे पावसाचे पाणी महामार्गावर साचून दरवर्षी अशी परिस्थिती निर्माण होत आहे.

# कर्जतमध्ये मुसळधार पावसाचा कहर



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशीही मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला असून, गेल्या २४ तासांत तब्बल २९१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामुळे उल्हास, चिल्हार आणि पेज नद्या दुथडी भरून वाहत असून उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे.

उल्हास नदीवरील दहिवलीमालेगाव पूल पाण्याखाली गेल्याने ३० हून अधिक गावांचा संपर्क काही काळ तुटला. कर्जत शहरातील नाना मास्तर नगर, मालवाडी, शनी मंदिर परिसर आणि इतर सखल भागात पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

नेरळ-कळंब राज्यमार्गावरील पुलावरूनही काही काळ पाणी वाहत असल्याने पोलिसांनी वाहतूक रोखून बंदोबस्त ठेवला. दुपारनंतर पाण्याची पातळी ओसरल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

# स्वच्छ भालगाव मिशनकडून वृक्षारोपण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील भालगाव येथे युवकांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या स्वच्छ भालगाव मिशन या स्वयंसेवी व अपक्ष सामाजिक उपक्रमांतर्गत ५ जुलै रोजी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ७५ झाडांची लागवड करण्यात आली. यावेळी वन अधिकारी, युवक-युवती आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



गावाच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या मिशनची सुरुवात स्वच्छता अभियानातून झाली. त्यानंतर वृक्षारोपण, नदी संवर्धन, प्रत्येक घरापर्यंत शाश्वत पाणीपुरवठा, प्लास्टिकमुक्त भालगाव अभियान, मोबाईल नेटवर्क सुविधा सुधारण्यासाठी पाठपुरावा, सोशल मीडियाद्वारे जनजागृती तसेच मंत्रालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांसाठी समन्वय अशा विविध उपक्रमांवर मिशन कार्यरत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गावाच्या विकासात प्रत्येक नागरिकाचा सहभाग वाढवणे आणि तरुणांनी सामाजिक नेतृत्व स्वीकारावे, हा मिशनचा प्रमुख उद्देश आहे. बोलण्यापेक्षा कृती श्रेष्ठ हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असलेल्या स्वच्छ भालगाव मिशन या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, गावातील तसेच गावाबाहेर राहणाऱ्या भालगावकरांनी या लोकचळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन मिशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# १९ प्रवाशांची सुटका

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने आपटा फाटारसायनी मार्गावर पाणी साचून वाहतूक विस्कळीत झाली. या पाण्यात एक मिनी बस, एक लक्झरी बस आणि एक इको वाहन अडकले. मिनी बसमध्ये चालकासह १६ प्रौढ व ३ लहान मुले असे एकूण २० जण (चालकासह) अडकले होते.

माहिती मिळताच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, पोलीस शिपाई जयेश पाटील, राकेश बर्डे आणि ग्रामस्थ सूर्यकांत घरत यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून पुराच्या पाण्यात उतरून सर्व प्रवाशांची सुखरूप सुटका केली. या बचावकार्यावेळी पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

# डंपरखाली चिरडून क्लिनरचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खडी भरण्यासाठी आलेल्या एका हायवा टिपर डंपर चालकाने कोणताही अंदाज न घेता गाडी रिव्हर्स घेतल्याने डंपरच्या मागच्या चाकाखाली चिरडून क्लिनरचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेलमधील कुंडेवहाळ कातकरीवाडी येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. पनवेल शहर पोलिसांनी डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

शंकर विठोबा इटकर (वय ४०) असे मृत क्लिनरचे नाव असून, तो तुर्भे येथील बोनसरी गावात राहत होता. तो विकास ट्रान्सपोर्ट कंपनीत क्लिनर म्हणून कार्यरत होता. शंकर इटकर हा विकास ट्रान्सपोर्ट कंपनीच्या डंपरसोबत पनवेल येथील कुंडेवहाळ कातकरीवाडी परिसरातील हवील एंटरप्रायझेस स्टोन क्रेशरच्या साईटवर खडी लोड करण्यासाठी गेला होता. खडी लोड झाल्यानंतर डंपर चालक प्रकाश बापू धोत्रे याने डंपर मागे घेण्यास सुरुवात केली.

पान १ वरून

## रायगडात जलप्रकोप

जिल्ह्यात सरासरी २११.९० मिमी पावसाची नोंद झाली असून, पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्यांत सर्वाधिक ३०० मिमीपेक्षा अधिक पाऊस झाला. जिल्ह्यातील २८ लघु प्रकल्पांपैकी १२ प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी, भिसेखिंड आणि नागोठणे परिसरात पाणी साचल्याने वाहतूक बंद करावी लागली. अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, कर्जत, पेण आणि पनवेल तालुक्यांतील अनेक गावांचा संपर्क तुटला असून, सखल भागात पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले.

वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांचे, गोठ्यांचे आणि वीज खांबांचे नुकसान झाले. रोहा तालुक्यातील नागोठणे उपकेंद्र परिसरात पाणी शिरल्याने सुमारे सात हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला. विविध ठिकाणी झाडे कोसळणे, रस्ते बंद होणे आणि दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे प्रशासन सतर्क झाले आहे.

दरम्यान, पनवेलमधील पांडवकडा धबधब्यावर दोन पर्यटक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना घडली असून, त्यांचा शोध सुरू आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्याने जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आणि पूरग्रस्त भागांपासून दूर राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सुभाषनगरमध्ये दरड..

निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये सातत्याने भीतीचे वातावरण असते. या समस्येबाबत स्थानिकांनी यापूर्वी अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. संरक्षण भिंत उभारणे, ठिसूळ खडकांवर सुरक्षा जाळी बसवणे, डोंगराच्या उतारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. इर्शाळवाडी आणि माळीण येथील दुर्घटनांचा संदर्भ देत सुभाषनगरमध्येही अशाच प्रकारची गंभीर घटना घडू शकते, याची जाणीव करून दिली आहे. खोपोलीतील सुभाषनगरमध्ये झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेनंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

## २८ जणांचे रेस्क्यू

हॉटेलच्या छतावर आश्रय घ्यावा लागला.

घटनेची माहिती मिळताच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था आणि रेस्क्यू टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वेगवान प्रवाह आणि प्रतिकूल परिस्थितीतही बचाव पथकाने दोन्ही ठिकाणी यशस्वी मोहीम राबवत सर्व २८ जणांना सुखरूप बाहेर काढले. या धाडसी बचावकार्यात मोठी जीवितहानी टळली असून, स्थानिक नागरिकांनी रेस्क्यू टीमच्या तत्परता आणि धाडसाचे कौतुक केले.

## पूरग्रस्तांकडे पाठ...

लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घ्याव्यात, नुकसानीचा आढावा घ्यावा आणि शासनाकडे तातडीने मदतीसाठी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. मात्र, अपेक्षित प्रमाणात लोकप्रतिनिधी घटनास्थळी न दिसल्याने पूरग्रस्तांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पर्यायी मार्गांचा वापर करा

गोव्यावरून मुंबईकडे येणाऱ्या वाहनचालकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन महामार्ग वाहतूक पथक, रायगड परिक्षेत्राने केले आहे. महामार्गावरील परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

असे आहेत पर्यायी मार्ग :

मुंबईहून गोव्याकडे : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे पुणे ताम्हिणी घाट निजामपूर नाका माणगाव राष्ट्रीय महामार्ग ६६ मार्गे गोवा.

गोव्याहून मुंबईकडे : माणगाव निजामपूर नाका ताम्हिणी घाट पुणे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे मुंबई. त्याचप्रमाणे पाल्हे बासपासमार्गे सुरू असणारी वाहतूकही बंद करण्यात आली आहे.

## माथेरानमध्ये मुसळधार

दरम्यान, जोरदार वाऱ्यामुळे झाडाची फांदी कोसळून दोन पर्यटक जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नेरळ येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. १ ते ५ जुलैदरम्यान माथेरानमध्ये ९३२.६ मिमी, तर आतापर्यंत एकूण १,१३९.८ मिमी पावसाची नोंद झाली असून, यंदाच्या हंगामात एक हजार मिमीचा टप्पा पार झाला आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत अद्याप सुमारे ४८६ मिमी पावसाची तूट कायम असल्याची माहिती पर्जन्यमापक निरीक्षक अन्सार महापुळे यांनी दिली.

## आज शाळांना सुट्टी

शक्यता आहे. स्थानिक परिस्थिती तसेच प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या अहवालांचा आढावा घेत हा निर्णय घेण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली तरी मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियमित कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या सूचनांनुसार आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## धबधबे, धरणांवर पर्यटनबंदी

**प्रशासनाकडून सक्त मनाईचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार● धबधबे, धरणे, दऱ्यांच्या कड्यावर जाऊन सेल्फी, फोटो किंवा रील्स काढण्यास बंदी. ●पावसाच्या पाण्यात उतरणे, पोहणे किंवा धबधब्याच्या प्रवाहाखाली बसण्यास मनाई. ●मद्यपान तसेच मद्याची वाहतूक किंवा विक्री करण्यास बंदी. ●धोकादायक ठिकाणी वाहने उभी करणे, अतिवेगाने वाहन चालवणे व ओव्हरटेक करण्यास मनाई. ● महिलांची छेडछाड, असभ्य वर्तन केल्यास कठोर कारवाई. ● डीजे लावून ध्वनीप्रदूषण करण्यास बंदी. ● धरणे व धबधब्यांच्या एक किलोमीटर परिसरात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व वाहनांच्या प्रवेशावर बंदी करण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक वसंत सावळाराम मोंधळे वैगेरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१ | ४/ब | एकुण क्षेत्र १-२९-५० पैकी विक्री केलेले क्षेत्र ०-२०-०० | १५-७२ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०७/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

# मुसळधार पावसाने उडवला हाहाकार

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाने हाहाकार उडविला आहे. शनिवारी (दि.४) रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे रविवारी (दि.५) अलिबाग शहरातील अलिबाग एसटी स्टँड, तळकर नगर, श्रीबाग, बायपास रोड व रामनाथ परिसरात पावसाचे पाणी घुसले होते. अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नागाव येथील मुख्य रस्ता पाण्याखाली गेला होता. अनेक वाहने बंद पडल्याने ती ढकलत नेताना मोठी कसरत करावी लगात होती. कुंट्यांची गोठी गावातून पुराचे पाणी वाहत होते. तसेच, मुरुड तालुक्यातील उसरोली आणि खैरवाडी येथील रस्ता पाण्याखाली गेला. रोहा तालुक्यात एका फार्महाऊस मध्ये पर्यटक अडकले होते. तर, उरणसह पनवेल, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर, खालापूर, कर्जत, पेण या तालुक्यांत देखील पुरस्थीती निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी घरात पाणी शिरले असून मोठे नुकसान झाले आहे. तर, काही ठिकाणी दरड आणि झाडे कोसळून वाहतूक ठप्प झाली होती. तसेच, काही गावांचा संपर्क देखील तुटला होता. काही ठिकाणी पर्यटक देखील अडकले होते.



● शनिवार रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे सोमवारी सकाळी अलिबाग एस.टी. स्थानक व परिसर पाण्याखाली गेला होता. (छायाचित्र: समीर मालोदे)

## पनवेल तालुक्यात पावसाचा कहर




। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यात शनिवारी (दि.४) रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः कहर केला असून, अनेक सखल भाग जलमय झाले आहेत. नांदगाव व डोलघर या गावांकडे जाणारे प्रमुख रस्ते पाण्याखाली गेल्याने दोन्ही गावांचा बाहेरील भागाशी संपर्क तुटला. त्यामुळे ग्रामस्थांना दैनंदिन कामांसाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रविवारी (दि.५) सकाळपासून नांदगाव आणि डोलघर परिसरातील नागरिकांना होडीच्या साहाय्याने प्रवास करावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षितपणे पाण्याच्या प्रवाहातून बाहेर काढण्यात येत होते. सततच्या पावसामुळे नदी-नाले, ओढे आणि खाड्या दुथडी भरून वाहत आहेत.

पनवेल शहरातील गांधी नदी दुथडी भरून वाहत असून, वडाळे तलाव देखील पूर्ण क्षमतेने भरले आहे. तलावाचे पाणी रस्त्यावर आल्याने जुने भाजी मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. उरण नाका परिसरातही रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती. साचलेल्या पाण्यात अनेक वाहने बंद पडल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली होती. मुस्लीम नाका येथे मोठ्या नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्याने परिसर जलमय झाला, तर बावन बंगला भागात भरतीच्या पाण्यामुळे काही घरांमध्ये पाणी शिरले होते. कर्नाळा (खारपाडा) नाका परिसरातील काही दुकाने आणि घरांमध्येही पाणी घुसल्याने नुकसान झाले आहे. पनवेल-उरण मार्गावरील करंजाडे गावाजवळील गाढी नदी परिसर, गणेशनगर, विचुंबे आणि उसर्ली गावांमध्येही पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. परिसरात सर्वत्र पाणीच पाणी दिसत असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

### ४३५ नागरिकांचे स्थलांतर

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार आतापर्यंत सुमारे ४३५ नागरिकांचे चार तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. त्यांना चहा, नाश्ता, जेवण, पिण्याचे पाणी तसेच अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत पनवेलमधील पटेल मोहल्ला व कच्ची मोहल्ला परिसरातील भारतनगर झोपडपट्टीतील १४९ नागरिकांना उर्दू शाळेत, २११नागरिकांना कोळीवाडा शाळेत, तर एचओसी कॉलनी आदिवासी वाडीतील ७५ नागरिकांना क्रीडा संकुलात सुरक्षितरीत्या स्थलांतरित करण्यात आले आहे.

### प्रशासनाचे आवाहन

सततच्या पावसामुळे परिस्थिती गंभीर बनत असून, नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडू नये. पूरग्रस्त रस्त्यांवरून जाण्याचा प्रयत्न करू नये. तसेच, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने खबरदारीचे उपाय अधिक तीव्र केले आहेत.

## मुसळधार पावसात पोलीस रस्त्यावर

। पनवेल । प्रतिनिधी ।

सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी वाहतुकीवर परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील, तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सपकाळ यांनी अधिकारी व अंमलदारांसह स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेतले. पावसामुळे पाणी साचलेले रस्ते, संथ गतीने सुरू असलेली वाहतूक आणि निर्माण होणारी कोंडी यावर तात्काळ उपाययोजना करत वाहनचालकांना सुरक्षित मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, वाहतुकीत अडकलेल्या नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करून कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सतत दक्षता घेण्यात आली. त्यांच्या या सेवाभावी कार्याचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

## मुरूडमध्ये २५८ मिमी पावसाची नोंद

। आगरदांडा । प्रतिनिधी ।



मुरुड तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडून रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून, नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मुरुड तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी संदेश वाळंज यांनी या पावसाची २५८ मिमीची विक्रमी नोंद केली आहे. तर, एकुण १२४२ मिमी नोंद करण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे तालुक्यातील शिघ्रे नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून, नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन केले आहे.

## रामराज गावाचा संपर्क तुटला

। रायगड । प्रतिनिधी ।



अलिबाग तालुक्यातील रामराज गावाला सततच्या पडणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे पुराचा वेढा बसला आहे. येथील सांबरकुंड खोरे व बोरघर खोऱ्यात झालेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीने डोंगरातील नद्या आणि ओढ्यांना आलेल्या पाण्याने महापुराची परिस्थिती रामराज परिसरात तयार झाली आहे. यावेळी प्रशासनाने सावधगिरी बाळगण्याचा इशारा नागरिकांना दिला आहे. दरम्यान, रामराज परिसरात असणाऱ्या ५२ गावांसाठी असणारी एकमेव बाजारपेठेचा संपर्क तुटला आहे. रामराज गावात जाण्यासाठी असणाऱ्या पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक थांबवण्यात आली आहे. रामराज गावातील बाजारपेठ आणि पाड्यांमधून पुराचे पाणी घुसण्यास सुरुवात झाली आहे. पावसाचा वेग पाहता रामराज परिसरातील भिलजी, बोरघर, या गावांना देखील पुरचा वेढा बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



## दरड कोसळून घरांचे नुकसान

। खरोशी । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील खरोशी येथे दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे दुरशेत येथील बाळगंगा नदीने रुद्र रूप धारण केले आहे. नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, गावातील ७० ते ८० घरांमध्ये पावसाचे पाणी घुसले. त्यामुळे घरांचे मोठे नुकसान झाले असून, इतर वस्तूंचे देखील नुकसान झाले आहे. मागील वर्षी प्रमाणेच यावर्षीही घरात पाणी घुसल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, गावातील एका घरावर दरड कोसळून भिंतीला तडा गेला आहे. त्यामुळे त्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर एका घरावर मोठे झाड पडल्याने त्यांचेही घराचे नुकसान झाले आहे.

## वेळास येथील घराचे पत्रे उडाले



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून, आता या पावसाला वादळी वाऱ्याचा जोड मिळाली आहे. या बदललेल्या हवामानाचा मोठा फटका रविवारी (दि.५) श्रीवर्धन तालुक्यातील वेळास येथील दळवीवाडीला बसला. पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास आलेल्या तीव्र वादळी वाऱ्याच्या झोक्यामुळे येथील स्थानिक रहिवासी साहिल दळवी यांच्या राहत्या घरावरील छपराचे सिमेंटचे पत्रे हवेत उडून गेले. अचानक आलेल्या तीव्र हवेच्या झोक्याने आणि वादळाच्या प्रचंड आवाजाने घराचे छप्पर आणि पत्रे एकाएकी उडून काही अंतरावर जाऊन पडले. पत्रे उडाल्यामुळे ऐन पावसाळ्यात घर उघडे पडले आणि घरातील संसारोपयोगी साहित्यात पाणी शिरून मोठे नुकसान झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे दळवी कुटुंबीय आणि परिसरातील नागरिक काही काळ प्रचंड भीतीखाली होते. या घटनेत घराचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. कुटुंबातील सर्व सदस्य सुखरूप बचावले आहेत. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने त्यांच्या घरातील सामान सुरक्षित स्थळी हलवण्यास मदत केली. स्थानिक महसूल प्रशासन आणि तलाठ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन झालेल्या नुकसानीचा रीतसर पंचनामा करावा आणि दळवी कुटुंबाला शासनाकडून त्वरित आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी वेळास येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## दिघी-भरणे रस्त्याला तलावाचे स्वरूप

। कापोली । प्रतिनिधी ।



जिल्ह्यात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पावसाचा कहर आहे. अतिवृष्टीमुळे श्रीवर्धन तालुक्यातील दिघी पोर्ट ते भरणे घाटातील रस्त्यावर डोंगर उमळून मातीसोबत छोटे-मोठे दगड आले आहेत. त्यातच काँक्रीटचे रोड करत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटर लाईनचे नियोजन न केल्यामुळे डोंगरातून येणारे पाणी थेट रस्त्यावर साचल्याने रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे या महामार्गावरून जाताना वाहन चालकांना फार मोठी कसरत करावी लागत आहे. कारण या रस्त्याचा ९० टक्के भाग पाण्याखाली गेला आहे. त्यामध्ये माती आणि दगडाचा अंदाज न आल्यामुळे मोठी जीवित हानी होऊ शकते. त्यामुळे संबंधित प्रशासनावर सर्वच स्तरांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

## महिसदरा नदीने ओलांडली धोक्याची पातळी



**रोहा** : मुंबई-गोवा महामार्गावरून पुई गावाजवळून जाणारी महिसदरा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असुन, या नदीचे पाणी गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आले आहे. त्यामुळे गोवे गावाकडे जाणारा मार्ग बंद झाला आहे. तसेच, येथील सर्व भातजमीन पाण्याखाली गेली असुन, नदीकाठच्या गावाला सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. गेले दोन ते तीन दिवस सतत पडत असेलेल्या मुसळधार पावसामुळे कोलाड परिसतील महिसदरा, कुंडलिका व गोदी नदी दुधडी भरून वाहत आहेत. या तिन्ही नदींनी धोक्याची पातळी ओलांडली असुन, गोवे गावाला पाण्याचा वेढा घातला आहे. त्यामुळे पुराचे पाणी रस्त्यावर आले असून, येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला झाला आहे. त्यामुळे धाटाव एमआयडीसीमध्ये कामावर जाणारे कामगार तसेच कोलाड बाजारपेठेत जाणाऱ्या नागरिकांना माघारी फिरावे लागले. तर, आंबेवाडी येथील समर्थ नगर येथे पूर स्थिती निर्माण झाली आहे.

## नियोजनशून्य कामांचा नागरिकांना फटका



। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

मुसळधार पाऊस, समुद्रातील भरती आणि स्थानिक पातळीवरील नियोजनाच्या अभावाचा तिहेरी फटका रेवदंडा परिसरातील नागरिकांना बसला आहे. येथील आंग्रेनगरसह अनेक भाग जलमय झाले आहेत. तसेच, घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, प्रशासनाच्या संथ आणि निष्क्रिय भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. रेवदंडा बहिरी गल्ली ते चौलकडे जाणाऱ्या मोरीचे खोदकाम करण्यात आले आहे. मात्र, वाढत्या पावसाचा आणि पाण्याच्या निचऱ्याचा पुरेसा विचार न करता हे काम करण्यात आल्याने बांधावरून रेवदंड्याकडे जाणारा मार्ग तात्पुरता बंद झाला आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत असून, दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले आहे. संबंधित कंपनीच्या निष्काळजी आणि नियोजनशून्य कारभारामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांसह सामाजिक कार्यकर्ते सुदेश माळी यांनी केला आहे.



## मुसळधार पावसाने चौल जलमय

**चौल** : शनिवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अलिबाग तालुक्यातील चौल परिसर जलमय झाला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रस्त्यांना ओढ्याचे स्वरूप आले असून, पाण्याचा जोरदार प्रवाह वाहत आहे. त्यामुळे काही अंतर्गत मार्ग बंद झाले असून, नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील शेतीही पाण्याखाली गेली असून, शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, परिसरात मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या भरावांमुळे नैसर्गिक पाण्याचे प्रवाह बंद झाल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी वस्त्या, रस्ते आणि शेतांमध्ये साचत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

## सुधागडातील जनजीवन विस्कळीत




। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रविवारी पाली-खोपोली महामार्गावरील अंबा नदी पुलाच्या जोडरस्त्यावर दोन्ही बाजूला सखल भागात पाणी भरले. त्यामुळे वाकण आणि खोपोली बाजूकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. परिणामी प्रवासी आणि वाहनचालकांचे मोठे हाल झाले. सुदैवाने रविवारची सुट्टी असल्याने विद्यार्थी व चाकरमान्यांची मोठी गैरसोय टळली.

दरम्यान, पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दोन्ही बाजूंना बॅरिगेट्स टाकून खबरदारी म्हणून वाहतूक थांबवली. याशिवाय भेरव येथील अंबा नदी पुलावरून पाणी गेल्यामुळे तिथली वाहतूकही बंद होती. वाकण-पाली मार्गावर वाकण नाक्याजवळ रस्त्यावर पाणी आल्याने, तसेच आवंढे गावाजवळील साकव पाण्याखाली गेल्याने एकमेकांशी संपर्क तुटला होता. ढोकळेवाडी येथे रस्त्यावर झाड पडले होते; मात्र, स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने ते तातडीने बाजूला करण्यात आले. तसेच, या पुरात पुलाजवळील शेतात पाणी शिरल्याने शेतकरी तुषार ठोंबरे यांचे सौर पॅनल पाण्यात बुडून लाखो रुपयांचे नुकसान झाले.

पाली-खोपोली महामार्गावर वावे गावासमोरील नाला तुंबल्याने पावसाचे पाणी मुख्य रस्त्यावर आले होते. त्यामुळे दुचाकी घसरून व चारचाकी वाहने अडकून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी प्रकाश पालरेचा यांना माहिती दिली. पालरेचा यांनी तातडीने टीमसह जेसीबी घेऊन घटनास्थळ गाठले व सफाई सुरू केली. या मोहिमेत निखिल शिंदे, निलेश सकपाळ, सीताराम म्हसके आणि उमेश म्हसके या ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे नाल्यातील अडथळा दूर होऊन रस्त्यावरील पाणी ओसरले व संभाव्य धोका टळला. प्रशासन आणि ग्रामस्थांच्या या सुसंवादाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पूल झाला, पण फायदा शून्य

अंबा नदीवर पूर्वीचा अरुंद व उंचीने लहान असलेल्या पुलाच्या बाजूला नवीन उंच व रुंद पूल बांधण्यात आला. त्यामुळे पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहील, अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र, नवीन मोठा पूल होऊनही त्याच्या दोन्ही बाजूंचे जोडरस्ते सखल भागात असल्याने नदीचे पाणी आता या रस्त्यांवरून वाहत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने या दोन्ही बाजूला मोरी टाकणे किंवा रस्ता उंच करणे गरजेचे होते. मात्र, तसे न झाल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# ‘संघा’ला जेव्हा जाग येते

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक सोईस्कर संघटना आहे. सोईस्कर असते तेव्हा हिचे पदाधिकारी बोलतात. गैरसोयीचे असते तेव्हा गप्प बसतात. भाजपवाले सध्या दणादण विरोधकांच्या पार्ट्या फोडत आहेत, नीतीमूल्ये धाब्यावर बसवत आहेत. पण याबाबत भाजपची मातृसंघटना म्हणून मिरवणाऱ्या संघाला काहीही म्हणायचे नाही. अयोध्येच्या राममंदिराच्या भानगडीबाबत मात्र संघाचा नाईलाज झालेला दिसतो.मंदिराच्या दानपेटीतील अपहारामुळे रामभक्तांच्या श्रध्देला ठेच लागली असल्याचे दुःख संघाने अखेर बोलून दाखवले आहे. या भानगडीची चर्चा इतके दिवस चालू आहे. त्याबाबत एकही पोलिस तक्रार न दाखल होताच उत्तर प्रदेश सरकारने विशेष तपासणी पथक नियुक्त केले. मंदिरात रोज लाखो रुपये दानपेटीत जमा होतात. त्याच्या मोजणीत भानगडी झाल्या हे केव्हाच स्पष्ट झाले होते. याखेरीज रामाला वाहिलेले कोट्यवधी किमतीचे सोन्याचांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तूंचा हिशेब लागत नाही हेही दिसले होते. पण संघ बहुधा लोकांचा अंदाज घेत होता. पंतप्रधान मोदींनी एक विशेष मदतनिधी स्थापन केला होता. त्यातील देणग्यांची माहिती बाहेर कोणालाही कळू शकत नव्हती. तो सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवला. हा सरळ सरळ एक भ्रष्टाचार होता. पण संघ त्यावर कधी तोंड उचकटून बोलला नाही. कारण आधी बराच ओरडा झाला तरी नंतर ते प्रकरण विरून गेले. जनतेतही त्याचे फार पडसाद उमटले नाहीत. राममंदिरातली भानगडही अशीच पचवता येते का याचा बहुदा अदमास घेतला जात असावा. पण इतके दिवस अयोध्येचे राममंदिर म्हणजे देशाची प्रतिष्ठा, देशाच्या स्वाभिमानाची पताका वगैरे भाषणबाजी केलेली असल्याने सर्व देशासाठी हा चर्चेचा विषय झाला. त्यातही जे कोट्यवधी भाबडे हिंदू आहेत त्यांना या भानगडींमुळे धक्का बसला. संघाचा सगळा पाठिंबा या भाबड्या जनतेतूनच येतो. त्यांच्यामध्येच निराशा पसरली तर संघाची कशीबशी उंच धरलेली प्रतिष्ठाही मातीत जाणार. हे ध्यानात आल्यावर बहुदा संघाने अखेर प्रतिक्रिया व्यक्त केली. या प्रकरणी दोषींना कठोर शासन होईल अशी आशा संघाने बोलून दाखवली आहे.

## बुलडोझर गायब

गेली बाराचौदा वर्षे देशात हिंदू विरुध्द मुसलमान असे वातावरण निर्माण करण्यात आले. मोदी सरकार, त्यांचे परिवारवाले इत्यादींनी तसे करण्यात थेट किंवा आडून आडून भाग घेतला. बहुतेक सगळे खून, बलात्कार करणारे मुसलमान, अतिरेकी कारवाया, देशद्रोही कारवाया करणारे ते मुसलमान असे एक चित्र यातून तयार करण्यात आले. पण संघाच्या संस्कारात तयार झालेल्या हिंदूंनी गेल्या बारा वर्षात जे काय दिवे लावले आहेत ते आता सगळ्या जनतेसमोर दिसू लागले आहे. भाजपने भ्रष्टाचारी लोकांना आपल्यासोबत घेतले, त्यांचे भ्रष्टाचार माफ केले. अदानीसारख्या भांडवलदारावर वाट्टेल त्या थराला जाऊन मेहेरनजर केली. अनेकांचे बलात्कार किंवा खूनसुध्दा पाठीशी घातले. आणि आता खुद्द राममंदिरामध्ये भानगड होऊनही मोदी आणि मंडळी गप्प आहेत. एरवी अशा प्रकरणांमध्ये लगेच इडी सक्रीय होते. आरोपींची घरे बुलडोझरने पाडली जातात. मग ती बेकायदा असोत की नसोत. नितेश राणेपासून अमित मालवीय याच्यापर्यंत भाजपची जनता मिडियामधून भुंकू लागते. आरोपी हे गुन्हेगार आहेतच असे ठरवून त्यांना शासन काय करायचे हेही सांगितले जाते. पण आता राममंदिराच्या प्रकरणात हे तमाम मिडियात चमकणारे व कोकलणारे वीर दार लावून घरात बसले आहेत. हिंदूंच्या भानगडींवर यांची दातखीळ बसली आहे. संघाचीही हीच स्थिती होती. पण अखेर त्याने धाडस केले. याला हिंदू परिवारातल्या अंतर्गत मारामाऱ्याही कारणीभूत आहेत. एक असा प्रवाद आहे की, राममंदिरावरची कारवाई योगी आदित्यनाथ यांच्या पुढाकारामुळे झाली. ती मोदी, शहा व दिल्लीतील भाजपवाल्यांना फारशी पसंत नाही. हे प्रकरण आपसात मिटवावे, काही जणांनी राजीनामे दिले की त्यावर पडदा टाकावा असे बहुदा दिल्लीवाल्यांना वाटत होते. मिडिया तर काय यांचा गुलामच आहे. अशा स्थितीत काही दिवसांनी लोक हे प्रकरण विसरून गेले असते. पण भानगडीचा मामला शेकडो कोटी रुपयांमध्ये गेल्याचे उघड झाले. शिवाय गेल्या पाच वर्षांपासून धड ऑडिटच झालेले नाही वगैरे गोष्टी पुढे आल्या. पोलिस केसही सुरू झाली. त्यामुळेच संघाचा नाईलाज झाला आणि शेवटी आपण दुःख झालेल्या हिंदूंच्या बाजूने असल्याचे दाखवावे लागले.

## कुठे गेले यांचे चारित्र्य?

गेली शंभर वर्षे संघ म्हणे चारित्र्यवान हिंदू घडवतो आहे. अयोध्या ही संघाची मोठी विजयपताका म्हणून दाखवली जाते. या तथाकथित आंदोलनातून तर चारित्र्यवानांची फौज निर्माण व्हायला हवी होती. पण वास्तवात एकाहून एक नग आणि गुंड निपजले असे दिसते. राममंदिराच्या दानातले पैसे मोजायला ठेवले त्यांनीच आपली घरे भरली. चंपत राय नावाचा जो एक महान संस्कारी पुरुष संघाकडून विहिंपमार्फत इकडे आला होता त्याच्या प्रमुखपदाखाली सगळी भानगड झाली. चंपत राय यांनी आता राजीनामा दिला आहे. राय हे खूप साधे आहेत वगैरे बातम्या केल्या जात आहेत. प्रश्न राय यांनी साधे असण्याचा किंवा पंचा नेसून राहण्याचा नसतो. अशा व्यक्तींच्या देखरेखीखाली भरपूर भ्रष्टाचार होऊ शकतो व हे साधे, सज्जन, प्रामाणिक वगैरे महानुभाव तिकडे काणाडोळा करतात हे आता तरी संघावर भाबडा विश्वास ठेवणाऱ्यांनी ध्यानात घ्यायला हवे. राम हे पारदर्शकतेचे दुसरे नाव आहे. पण संघाला केवळ त्याच्या नावाने राजकारण करता येते. तसे नसते तर ऐन राममंदिरातच लोकांचे पैसे लुबाडले गेले नसते. विशेष म्हणजे याबाबत पहिल्यांदा बोलले ते समाजवादी पार्टीचे नेते. आणि आता त्यांनाच संघ हिंदूविरोधी आणि राष्ट्रविरोधी ठरवत आहे. या प्रकरणाच्या निमित्ताने हिंदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न चालू आहे असे होसबळे यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे. म्हणजे, राममंदिराचे कोट्यवधी रुपये हडप करणे ही हिंदूंची बदनामी नाही. त्यांना पाठीशी घालणे ही बदनामी नाही. त्याच्याबद्दल मौन बाळगणे हा हिंदूंचा अपमान नाही. आपण म्हणू ते म्हणजे हिंदुत्व, आपण हिंदूंच्या वतीने बोलणारी एकमेव संघटना, आपण म्हणजे चारित्र्य वगैरे बाता आता संघाने बंद कराव्यात. लोक त्यातला पोकळपणा समजून चुकले आहेत. आता तर बद्रीनाथ मंदिरातही भानगड झाल्याच्या बातम्या आल्या आहेत. देशभरातील असंख्य मंदिरांमध्ये हेच चालू आहे. चारेक महिन्यात नाशिकला कुंभमेळा होणार आहे. तिथे स्वतःला साधू व संत म्हणवणारे अनेक हिंदू गोसावडे येणार आहेत. यांचे मठ, यांचे आखाडे इत्यादींचे पैशांचे व्यवहार, आपसातल्या हाणामाऱ्या यांची चर्चा अधिक असते. हिंदूंचे आध्यात्म किंवा चारित्र्य वाढण्यामध्ये यांचा किती उपयोग असतो हे प्रत्येकाने तपासून पाहावे. राममंदिरातील भानगड आणि संघाने त्याबद्दल उशिराने ढाळलेले अश्रू हा हिंदुत्वाचा खरा चेहरा आहे. हे सगळे राजकारण आहे. हिंदूंची मते कमी होतील यासाठीचे हे नकली दुःख आहे. याचा खऱ्या धर्माशी आणि प्रभू श्रीरामाशी काडीचाही संबंध नाही.

---

**विचार**

# इंधनदर आणि रिॲल्टीला धक्का

***सरत्या आठवड्यात अर्थजगतावर परिणाम घडवणाऱ्या घडामोडी जास्त समोर आल्या. व्हेनेझुएलामध्ये भूकंप झाल्याची बातमी समोर आली, पण एक प्रकारे या घटनेचा गंभीर फटका भारताला बसला. याच सुमारास सवलती देऊनही अनेक शहरांमध्ये फ्लॅट विकले जात नसल्याचे तथ्य समोर आले. दरम्यान हिरे बाजारातून आलेल्या नैसर्गिक हिऱ्यांची चमक वाढत असल्याच्या बातमीने या क्षेत्राची झगमग जवळून पहायला मिळाली.***

**डॉ. सुकृत खांडेकर**

सरत्या आठवड्यात महत्वाच्या अर्थवार्तांपेक्षा आर्थिक जगतावर परिणाम घडवणाऱ्या घडामोडी जास्त पहायला मिळाल्या. व्हेनेझुएलामध्ये भूकंप झाल्याची बातमी समोर आली, पण एक प्रकारे या घटनेचा गंभीर फटका भारताला बसला. याच सुमारास सवलती देऊनही अनेक शहरांमध्ये फ्लॅट विकले जात नसल्याचे तथ्य समोर आले. दरम्यान हिरे बाजारातून आलेल्या नैसर्गिक हिऱ्यांची चमक वाढत असल्याच्या बातमीने या क्षेत्राची झगमग जवळून पहायला मिळाली.

दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलामध्ये झालेल्या तीव्र भूकंपानंतर त्याचे पडसाद भारताच्या ऊर्जा सुरक्षेवरही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अलीकडच्या काळात भारतासाठी कच्च्या तेलाचा महत्त्वाचा पुरवठादार बनलेल्या व्हेनेझुएलामध्ये निर्यात पायाभूत सुविधांवर परिणाम झाल्यास तेलपुरवठा, शिपिंग आणि विमा खर्चावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. व्हेनेझुएलामध्ये अलिकडेच काही सेकंदांच्या अंतराने ७.२ आणि ७.५ रिश्टर स्केल तीव्रतेचे दोन भूकंप झाले. हे धक्के गेल्या शतकातील सर्वात तीव्र भूकंपांपैकी मानले जात असून, शेकडोजणांचा मृत्यू, हजारो जखमी होऊन अनेक भागांमध्ये आफ्टरशॉक्स सुरू असल्याची माहिती समोर आली. मध्यपूर्वेतील तणावामुळे भारताने अलीकडच्या महिन्यांमध्ये कच्च्या तेलाच्या आयातीसाठी व्हेनेझुएलाकडे मोठ्या प्रमाणात मोर्चा वळवला. एप्रिल आणि मे महिन्यात भारताने व्हेनेझुएलातून तेल आयात लक्षणीय वाढवली होती. त्यामुळे व्हेनेझुएला भारताच्या प्रमुख कच्चे तेल पुरवठादार देशांपैकी एक बनला. तज्ज्ञांच्या मते, भूकंपामुळे तेल उत्पादन केंद्रांना मोठे नुकसान झाले नाही तरी वीजपुरवठा खंडित होणे, रस्ते आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणे तसेच बंदरांवरील निर्बंध यामुळे तेल निर्यात आणि जहाजांची वाहतूक अनेक दिवस किंवा आठवडे उशिरा होऊ शकते.

व्हेनेझुएलातील ला ग्वायरा या प्रमुख कार्गो बंदरावर आणीबाणी जाहीर करण्यात आली. त्यामुळे जहाजांना माल चढवण्यास विलंब होणे, मार्ग बदलण्याची गरज आणि डेमरेज शुल्क (विलंब शुल्क) वाढण्याची शक्यता आहे. परिणामी, हा अतिरिक्त खर्च व्यापारी, रिफायनरी कंपन्या आणि अखेरीस ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतो. तज्ज्ञांचे मत आहे, की आतापर्यंत व्हेनेझुएलाशी संबंधित सागरी विमा पॉलिसींमध्ये प्रामुख्याने भू-राजकीय आणि निर्बंधांशी संबंधित जोखमींचा विचार केला जात होता; मात्र या भूकंपामुळे नैसर्गिक आपत्तीचा धोका नव्याने समोर आला असून भविष्यात विमा प्रीमियम वाढण्याची शक्यता आहे. व्हेनेझुएलामध्ये भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचीही गुंतवणूक आहे. ‘ओएनजीसी विदेश’ची तेथील तेल प्रकल्पांमध्ये भागीदारी असून, दीर्घकाळ पुरवठा विस्कळीत राहिल्यास भारतीय गुंतवणुकीवर आर्थिक आणि कार्यकारी परिणाम होऊ शकतो. ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भारताने मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी व्हेनेझुएलासारख्या पर्यायी स्रोतांकडे वळण्याचा निर्णय घेतला असला, तरी प्रत्येक नवीन पुरवठा मार्गासोबत नवीन जोखमीही येतात. त्यामुळे ऊर्जा आयात विविध देशांमध्ये विभागण्याबरोबरच पुरवठा साखळीतील नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे.

दरम्यान, देशातील रिअल इस्टेट बाजारात गेल्या काही वर्षांमधील तेजीनंतर आता मंदीची चिन्हे दिसू लागली आहेत. आनंद राठी संस्थेच्या अहवालानुसार २०२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये विकल्या न गेलेल्या घरांचा साठा वाढून १८ महिन्यांपासून पडून असलेल्या साठ्यापर्यंत पोहोचला आहे. म्हणजे आजपासून नवीन गृहनिर्माण प्रकल्प सुरू झाले नाहीत, तरी बाजारातील विद्यमान घरे विकण्यासाठी सुमारे दीड वर्ष लागेल. २०२४ मध्ये हा कालावधी १४ महिन्यांचा होता. अहवालानुसार, गृहनिर्माण क्षेत्रात मागणी आणि पुरवठा यांच्यातील समतोल बिघडला आहे. विकासकांना निधी सहज उपलब्ध होत असल्याने मोठ्या प्रमाणावर नवीन प्रकल्प बाजारात येत आहेत; मात्र त्यानुसार घरांची मागणी वाढलेली नाही. परिणामी, २०२३ मध्ये विक्री झालेल्या ४.८ लाख घरांचा विक्रम २०२६ मध्ये घसरून सुमारे चार लाख घरांवर आला असून विक्रीमध्ये वर्षभरात सुमारे नऊ टक्क्यांची घट झाली आहे. विशेष म्हणजे, घरांच्या संख्येने विक्री कमी झाली असली, तरी बाजारातील एकूण व्यवहारमूल्य वाढले आहे. ग्राहक आता परवडणाऱ्या घरांपेक्षा महागड्या आणि प्रीमियम घरांकडे अधिक वळत असल्याचे स्पष्ट होत आहे. राठी यांच्या मते, सध्याची परिस्थिती रिअल इस्टेट क्षेत्रातील मंदी नसून ‘व्हॉल्यूम करेक्शन’ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये झालेल्या वेगवान वाढीनंतर बाजार स्वतःच समतोल साधत आहे. व्याजदर स्थिर राहिले किंवा कमी झाले, तर येत्या काळात गृहनिर्माण बाजाराला पुन्हा चालना मिळू शकते.

८० लाख ते १.५ कोटी रुपयांच्या घरांच्या श्रेणीत २०२३ मध्ये चांगली वाढ झाली होती; मात्र २०२५ मध्ये या विभागातील विक्री आठ टक्क्यांनी कमी झाली. १.५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या प्रीमियम घरांच्या विक्रीमध्ये मोठी घसरण झाली नसली, तरी वाढीचा वेग कमी झाला आहे. २०२२ मध्ये या विभागात १४९ टक्के वाढ झाली होती. ती २०२५ मध्ये केवळ सहा टक्क्यांवर आली आहे. मुंबईमध्ये गेल्या दोन वर्षांमध्ये प्रीमियम घरांच्या विक्रीत १५ टक्क्यांची घट झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, सध्या रिअल इस्टेट क्षेत्रात मोठी मंदी नसली तरी बाजार नव्या समतोलाच्या टप्प्यातून जात आहे. पुढील काळात व्याजदर, रोजगारस्थिती आणि ग्राहकांचा आत्मविश्वास यावर गृहनिर्माण क्षेत्राची दिशा अवलंबून राहणार आहे. सोने, चांदी आणि मौल्यवान दागिन्यांचा भारतातील सांस्कृतिक वारसा हजारो वर्षांचा आहे; मात्र एके काळी केवळ श्रीमंतवर्गाची पसंती असलेले नैसर्गिक हिऱ्यांचे दागिने आता मध्यमवर्गीय, नोकरदार, व्यावसायिक महिला तसेच तरुण पिढीपर्यंत पोहोचत आहेत. परिणामी भारत अमेरिकेनंतर जगातील दुसरी सर्वात मोठी नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची बाजारपेठ म्हणून उदयास आला आहे. ही वाढ केवळ खरेदीक्षमतेत झालेल्या वाढीचेच नव्हे, तर बदलत्या जीवनशैलीचे आणि गुंतवणुकीच्या नव्या प्रवाहाचेही प्रतीक आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. भारतात नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची मागणी सध्या वार्षिक सुमारे १२ टक्क्यांनी वाढत आहे. २०१९ मध्ये हा दर दहा टक्के होता. यावरून या क्षेत्रातील वाढ किती वेगाने होत आहे, याचा अंदाज येतो. उद्योगक्षेत्रातील अंदाजानुसार २०३० पर्यंत भारतातील नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची बाजारपेठ सुमारे १.५२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते. ही वाढ भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलत्या ग्राहकवर्गाची साक्ष देते. या वाढीमागे महिलांचा सर्वात मोठा वाटा आहे. विवाह, वाढदिवस किंवा सण-उत्सवापुरतेच नव्हे, तर दैनंदिन वापरासाठीही हलके, आकर्षक आणि आधुनिक डिझाइनचे हिऱ्यांचे दागिने पसंत केले जात आहेत. विशेष म्हणजे मिलेनियल्स आणि ‘जनरेशन झेड’ या तरुण ग्राहकांचा या बाजारातील वाटा तब्बल ८६ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. ही पिढी दागिन्यांकडे केवळ संपत्ती म्हणून नव्हे, तर व्यक्तिमत्त्व, भावनिक मूल्य आणि जीवनशैलीचा भाग म्हणून पाहते.

ग्राहकांचा विश्वास केवळ सोन्यापुरता मर्यादित राहिला नसून नैसर्गिक हिऱ्यांकडेही वाढत असल्याचे स्पष्ट होते. या वाढीमागील आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सोन्याच्या वाढत्या किंमती. गेल्या दोन वर्षांमध्ये सोन्याचे दर विक्रमी पातळीवर पोहोचल्याने ग्राहक अधिक किफायतशीर पर्याय शोधू लागले आहेत. त्यामुळे हलक्या वजनातील, आधुनिक डिझाइन असलेले हिऱ्यांचे दागिने लोकप्रिय ठरत आहेत. कमी कॅरेटचे सोने आणि लहान आकारातील नैसर्गिक हिरे यांचा संगम असलेले दागिने तरुण वर्गात विशेष पसंत केले जात आहेत. नैसर्गिक हिऱ्यांच्या बाजारातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचा मर्यादित पुरवठा. जगभरातील प्रमुख खाणींमधून उत्पादन कमी होत आहे. अनेक प्रसिद्ध खाणींचा साठा आटत चालला असून नवीन मोठे स्रोत सापडत नाहीत. परिणामी, नैसर्गिक हिऱ्यांच्या किंमती पुन्हा वाढू लागल्या आहेत. प्रयोगशाळेत तयार होणारे कृत्रिम हिरे (लॅब-ग्रोन डायमंड) कमी किमतीत उपलब्ध असल्याने छोट्या आकाराच्या नैसर्गिक हिऱ्यांवर किंमतीचा दबाव वाढत आहे. पर्यावरणपूरक उत्पादन आणि परवडणाऱ्या किमतीमुळे काही ग्राहक लॅब-ग्रोन हिऱ्यांना पसंती देत आहेत. त्यामुळे नैसर्गिक हिऱ्यांच्या उद्योगाला गुणवत्ता, दुर्मिळता आणि दीर्घकालीन मूल्य यावर अधिक भर द्यावा लागणार आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा हिरे घासणी आणि पॉलिशिंग उद्योग असलेला देश आहे. ‘मेक इन इंडिया’ धोरण आणि उत्पादनक्षेत्राला चालना देण्याच्या सरकारी धोरणांमुळे या उद्योगाला आणखी बळ मिळू शकते.

---

**चर्चा आजची**

# मुलांभोवती घोंघावतेय सायबरचे वावटळ

**सुयोग आंग्रे**

आज इंटरनेट मीडियाच्या जगात, मुलांना त्यांचे बालपण लाइक्स आणि व्ह्यूजने वेढून घालवायला भाग पाडले जाते. मुलांचे मोबाईल स्क्रोल करणे, चॅटिंग करणे, रील्स पाहणे तसेच रील्स तयार करण्यात पालकांचा सक्रिय सहभाग हा चिंतेचा विषय ठरत आहे. यामुळे ८० टक्क्यांहून अधिक मुलांची चित्रे किंवा त्यांचे व्हिडिओ इंटरनेटवर उपलब्ध आहेत. म्हणजे खेळण्याच्या, खाण्याच्या, वाचण्याच्या आणि काही सर्जनशील काम करण्याच्या वयात आपणच त्यांना सायबर गुंडगिरी, ऑनलाइन शोषण, डिजिटल व्यसन तसेच गोपनीयतेचे आक्रमण आणि नको असलेल्या मानसिक दबावाकडे ढकलत आहोत.याला जबाबदार धरायचे तर कोणाला धरायचे? पालक कि बदलती शिक्षण व्यवस्था? असा प्रश्न सर्वसामान्य पालकांना पडला असेल खरेतर आपल्या मुलांना मोबाईलचा वापर कितपत करू द्यायचा याकडे आपण लक्ष द्यायला हवे आज जगातील सुमारे ४० कोटी मुले इंटरनेट वापरतात. भारतात, नऊ ते तेरा वर्षे वयोगटातील सुमारे ७६ टक्के मुले फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूब यांसारख्या इंटरनेट माध्यमांचा वापर केवळ वेळ घालवण्यासाठीच करत नाहीत, तर मुलांचे प्रभावशाली बनण्याच्या दिशेनेही ते वाटचाल करत आहेत. आज, एकट्या इंस्टाग्रामवर ८३ हजारांहून अधिक मुलांचे प्रभावशाली सक्रिय आहेत. अलिकडच्या वर्षांत त्यांची संख्या ४१ टक्क्यांहून अधिक वाढली आहे. याचे कारण पालकांना काम असले कि, मोबाईल मुलांच्या हातात देऊन आपली कामे करण्यासाठी निघून जाणे आणि नव्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये दिले जाणारे प्रकल्प शोधण्यासाठी म ोबाईल मुलांच्या पाहत देणे, यापेक्षा दैवदुर्विलास नाही. इंटरनेट मीडियामध्ये गुंतलेली मुले आता केवळ रील्स किंवा व्हिडिओ पाहणारे नाहीत तर ते जाहिरातीसाठी सामग्री निर्माते आणि ब्रँड बनत आहेत. कंटेंट क्रिएशनमधूनही ते लाखो रुपये कमावत आहेत. सर्वेक्षणे दाखवतात की २०१० नंतर जन्मलेल्या ३७ टक्के मुलांना इंटरनेट मीडियाच्या क्षेत्रात प्रभावशाली बनायचे आहे. या मुलांचे पालक त्यांचे खाते तयार करणे, त्यांचे व्हिडिओ शूट करणे, ते संपादित करणे आणि इंटरनेट मीडियावर अपलोड करणे ही कामे सांभाळतात. ही किड्स डिजिटल इकॉनॉमी ही केवळ आर्थिक संकल्पना नाही तर ती बालहक्क, सुरक्षा, गोपनीयता आणि नैतिकतेशी संबंधित समस्या आहे. जेव्हा मुले इंटरनेट मीडियावर सक्रिय असतात, व्हिडिओ पाहतात किंवा गेम खेळतात तेव्हा ते केवळ मनोरंजनच नाही तर डेटा देखील तयार करतात. त्यांचे वागणे, सवयी, आवडी-निवडी, आवडीनिवडी या डिजिटल कंपन्यांसाठी आर्थिक मूल्य आहे. म्हणजेच, जेव्हा एखादे मूल व्हिडिओ पाहते, ॲप डाउनलोड करते, गेम खेळते किंवा ऑनलाइन क्लासमध्ये भाग घेते तेव्हा त्याचे स्थान, वर्तन आणि आवडींशी संबंधित डेटा गोळा केला जातो. डिजिटल कंपन्या हा डेटा मार्केट रिसर्च, जाहिराती, व्यवसाय धोरणे तयार करण्यासाठी आणिक्रमवारी प्रणालीच्या शिफारसी करण्यासाठी वापरतात. यामुळेच आज मुलांशी संबंधित डेटाची सुरक्षा हा गंभीर चिंतेचा विषय बनत चालला आहे. ही डिजिटल अर्थव्यवस्था मुलांना शिक्षण, नवनिर्मिती, उद्योजकता आणि नवीन जागतिक संधींशी जोडू शकते, परंतु या लालसेपोटी जर आपण त्यांची डिजिटल सुरक्षा, गोपनीयता आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केले तर ते एक गंभीर आव्हान बनू शकते. सध्या त्याची चिन्हेही दिसू लागली आहेत. आज डिजिटल क्रांतीचा वेग वेगवान असताना, आपण मुलांना डिजिटल बालमजुरीकडे वळवत आहोत की नाही, अशी चर्चा जगभरात वाढत आहे. या डिजिटल युगात कारखान्यांची जागा स्मार्ट फोनने घेतली आहे आणि मशीनची जागा क्रमवारी प्रणालीने घेतली आहे. भारतासह जगातील अनेक देशांतील मुलांवर इंटरनेट मीडियाचे वाढते दुष्परिणाम लक्षात घेता, नुकतेच संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाने ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मुलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ऑस्ट्रेलियाने १६ वर्षाखालील मुलांसाठी इंटरनेट मीडिया प्रतिबंधित केले आहे. फ्रान्स, स्पेन, डेन्मार्क, इंडोनेशिया आणि मलेशियानेही किशोरवयीन मुलांचे ऑनलाइन संरक्षण करण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. ब्रिटनही अशीच योजना आखत आहे. हे पाहता, १६ वर्षांखालील किशोरवयीन मुलांसाठी इंटरनेट मीडियाच्या वापरावर बंदी घालण्याबाबत भारतातही चर्चा तीव्र होत आहे. मुले दिवसातून ५-६ तास इंटरनेट मीडिया प्लॅटफॉर्मवर असल्याने भावनिक कमकुवतपणासोबतच त्यांची विचार करण्याची, समजून घेण्याची आणि एकाग्र करण्याची क्षमताही सातत्याने कमी होत आहे. ऑनलाइन सुरक्षेशी संबंधित कायदे मुलांवरील सायबर धोक्यावर नियंत्रण ठेवू शकतात, परंतु ते समाजाला सतर्क करण्याचे काम करू शकत नाहीत. यासाठी समाजात व्यापक चर्चा होण्याची गरज आहे. पालक आणि पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की मुलांचे खरे यश डिजिटल जगात आवडी, दृश्ये आणि सामग्री निर्मितीद्वारे मोजले जाऊ शकत नाही. शिक्षण आणि समाजाच्या माध्यमातून त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यातच खरे यश आहे. त्यामुळे शाळांना विद्यार्थी आणि पालकांना डिजिटल साक्षरता कार्यक्रमाचा भाग बनवावे लागणार आहे. बालहक्कांना डिजिटल अधिकारांशी जोडून डिजिटल कंपन्यांची जबाबदारीही निश्चित करावी लागेल. सरकार, तंत्रज्ञान कंपन्या, शाळा, पालक आणि समाजातील सर्व घटकांनी डिजिटल अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी एकमेकांशी समन्वय साधून कार्य केले पाहिजे जिथे मुलांना सुरक्षित, आदरणीय आणि सशक्त डिजिटल नागरिक बनवले जाईल आणि केवळ डिजिटल ग्राहक किंवा कामगारच नाही.तर त्यामाध्यमातून देशाच्या सुजाण नागरिक बनविण्याचा पाया रचला गेले पाहिजे यासाठी प्रत्येक पालकांसह शिक्षकांची जबादारी अधिक वाढली आहे. कारण सायबरचे वावटळ थांबविले नाहीतर भयंकर परिणामांना सामोरे जावे लागणार यात तिळमात्र शंका नाही.

---

**लोकसंसद**

## वैभव सूर्यवंशीचे ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय पदार्पण!

इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर पार पडलेल्या दुसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात भारताच्या वैभव सूर्यवंशी या अवघ्या १५ वर्षे आणि ९९ दिवस वयाच्या मुलाने भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऐतिहासिक पदार्पण केले आणि पाकिस्तानच्या हसन रझानंतर (वय १४ वर्षे २२७ दिवस) राष्ट्रीय संघात पदार्पण करणारा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील तो केवळ दुसराच खेळाडू ठरला. त्याचबरोबर त्याने भारताच्या सचिन तेंडुलकर (१६ वर्षे २०५ दिवस), पीयूष चावला (१७ वर्षे ७५ दिवस), एल. शिवरामकृष्णन (१७ वर्षे ११८ दिवस), पार्थिव पटेल (१७ वर्षे १५२ दिवस), मनिंदर सिंग (१७ वर्षे १९३ दिवस), हरभजन सिंग (१७ वर्षे २८८ दिवस) , लक्ष्मी रतन शुक्ल (१७ वर्षे ३२० दिवस) आणि चेतन शर्मा (१७ वर्षे ३३८ दिवस) या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पदार्पणाच्या बाबतीत मागे टाकले. खरे तर तर जागतिक क्रिकेटमध्ये इतक्या निष्पाप आणि लहान वयात मुख्य राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य फार कमी खेळाडूंच्या वाट्याला आले आहे. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळाडूंची मानसिक आणि शारीरिक क्षमता पणाला लागते. अशावेळी वैभव सूर्यवंशी या केवळ १५ वर्षांच्या मुलाने जगातील सर्वोत्तम गोलंदाजांचा निर्भयतेने सामना करणे हे त्याच्या अफाट प्रतिभेची साक्ष देते. वैभव सूर्यवंशीचे हे यशस्वी पदार्पण आपल्या क्रिकेटवेड्या देशातील लाखो उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देईल यात शंका नाही.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे

---

**दिनविशेष**

# श्रेष्ठ कथाकार व्यंकटेश माडगूळकर

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे श्रेष्ठ मराठी कथाकार आणि कादंबरीकार होते. त्यांचा जन्म ६ जुलै १९२७ रोजी सांगलीतील माडगूळ या ठिकाणी झाला. औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. तथापि स्वप्रयत्नाने वाङ्मयाचा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचेही वाचन केले. आरंभी काही काळ पत्रकारिता केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी माणदेशी माणसे (१९४९) हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. मराठी कवी, गीतकार मा.ग.दि. माडगूळकर यांचे व्यंकटेश माडगूळकर हे धाकटे बंधू होत. व्यंकटेश माडगूळकर हे आकाशवाणीवर दीर्घकाळ नोकरीत होते. आरंभी काही काळ पत्रकारिता केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास व्यंकटेश माडगूळकर मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी ममाणदेशी माणसेफ हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी सहित्याला अनोखे होते. अद्भुतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता ह्यांच्या ह्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या ह्या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, सीताराम एकनाथ, काळी आई, जांभळीचे दिवस ह्यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जागतिक भाषांत झालेले आहेत. ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. बनगरवाडी, वावटळ, पुढचं पाऊल, कोवळे दिवस, करुणाष्टक, आणि सत्तांतर, ह्या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. मराठी साहित्याला अनेक लेखकांनी आपल्या लेखनाने समृद्ध केले. सरस्वतीचा आशिर्वाद लाभलेले आणि भाषेची देणगी लाभलेले असेच एक लेखक म्हणजे व्यंकटेश दिगंबर माडगूळकर. मूळचे माडगूळमधील असणारे व्यंकटेश माडगूळकर यांचा आज जन्मदिन. त्यांनी कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णन लिहून अनेक अफाट साहित्य निर्माण केले. त्यांची बनगरवाडी, जंगलातील दिवस, वावटळ अशी अनेक पुस्तके लिहिली. लेखनासह व्यंकटेश माडगूळकर हे १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. त्यांनी आपल्या लेखनाने मराठी भाषेमध्ये मोठे योगदान दिले.

त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी साहित्याला अनोखे होते. अद्भुतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर ‘गावाकडच्या गोष्टी’ (१९५१), ‘हस्ताचा पाऊस’ (१९५३), ‘सीताराम एकनाथ’ (१९५१), ‘काळी आई’ (१९५४), ‘जांभळाचे दिवसफ (१९५७) यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जागतिक भाषांत झालेले आहेत. ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ‘बनगरवाडी’ (१९५५), ‘वावटळ’ (१९६४), ‘पुढचं पाऊल’(१९५०), ‘कोवळे दिवस’ (१९७९), ‘करुणाष्टक’ (१९८२) आणि ‘सत्तांतर’ (१९८२) या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत.

बनगरवाडीतून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. ‘तू वेडा कुंभार’, ‘सती’, ‘पति गेले गं काठेवाडी’ ही त्यांची काही नाटके विशेष उल्लेखनीय होत. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. १९८३ मध्ये अंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला. अशा या श्रेष्ठ लेखकाचे २८ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

६ जुलै

१) श्री. कृष्णा लक्ष्मण शेळके वेश्वी, अलिबाग, ६-७-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**रमाकांत नारायण पिसाट, स्मरणार्थ अलिबाग**

## प्रतिभा जाधव यांचे निधन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील कशेळे येथील रहिवासी आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील सेवानिवृत्त आरोग्य सहायिका प्रतिभा यशवंत जाधव वय वर्ष ६० यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या जाण्याने कशेळे गावासह संपूर्ण कर्जत तालुक्यात शोककळा पसरली आहे.



प्रतिभा जाधव यांनी आरोग्य सेवेत तब्बल ३६ वर्षे आरोग्य सेविका म्हणून अविरत सेवा दिली. दरम्यान आपल्या सेवाकाळात त्यांनी कशेळे प्राथमिक आरोग्य केंद्र, खांडस, आणि मोहीली येथे आरोग्य सेविका म्हणून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही उत्तम काम केले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे होणार सर्वेक्षण

**● १० जुलैपर्यंत हे सर्वेक्षण पूर्णचे आदेश● १५ जुलैपर्यंत अंतिम अहवाल सादर होणार**

**। रायगड । प्रतिनिधी ।**
समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ० ते १८ या वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षी करण्यात आलेल्या या सर्वेक्षणातून राज्यात यूडायस प्रणालीमध्ये १४ हजार दिव्यांग विद्यार्थ्यांची वाढ झाली होती. त्यामुळे १० जुलैपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.



महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे सहसंचालक देविदास कुलाळ यांनी याबाबत जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी, महापालिकांचे प्रशासन अधिकारी यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. विदर्भासह राज्यभरातील शाळा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे शून्य ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांचे विशेष गरजाधारक दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करावे, १० जुलैपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी केंद्रात समायोजन झालेल्या केंद्रस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तरावरील सर्व विशेष शिक्षकांना नेमून दिलेल्या केंद्रात सर्वेक्षण पूर्ण करण्याबाबत तत्काळ सूचना देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात केलेल्या सर्वेक्षणामुळे राज्यात यूडायस प्रणालीमध्ये १४ हजार दिव्यांग विद्यार्थ्यांची वाढ झाली होती. त्यामुळे सर्वेक्षणाचे महत्त्व पाहता सर्व विशेष शिक्षकांना त्यांना नेमून दिलेल्या केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाबाबत आदेशित करावे. सर्व स्तरावरील विशेष शिक्षक यांना सर्वेक्षणाव्यतिरिक्त कोणतेही जिल्हा किंवा तालुकास्तर काम काजवाटप देण्यात येऊ नये. सर्वेक्षणादरम्यान सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांची यूडायस प्रणालीमध्ये नोंद करण्याबाबत केंद्रातील नेमून दिलेल्या विशेष शिक्षकांनी मुख्याध्यापकांशी समन्वय साधून प्रणालीमध्ये सर्वेक्षणातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करून द्यावी.

नोंद झाल्याची खात्री करावी, केंद्रप्रमुखांनी त्यांच्या केंद्रात दिव्यांग विद्यार्थी सर्वेक्षण पूर्ण झाल्याची खातरजमा करून केंद्रप्रमुख, संबंधित विशेष शिक्षक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रमाणित केलेला एकत्रित अहवाल सादर करावा. दिव्यांग विद्यार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहिल्यास तो मिळणाऱ्या सेवासुविधांपासून वंचित राहील, ही बाब लक्षात घेऊन दक्षतेने सर्वेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व केंद्राचे सांख्यिकीय अहवाल एकत्रीकरण करून जिल्हास्तरीय अहवाल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला सादर करावा लागणार आहे. अहवाल सादरीकरणासाठी १५ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

## मटण मार्केटलगत वीज बॉक्स

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
खारघर सेक्टर-१४ मधील पेट्रोल पंपालगत असलेल्या मटण, चिकन आणि मासळी मार्केट परिसरात असलेल्या वीज बॉक्सच्या अगदी शेजारी मटण विक्री व्यवसाय सुरू असल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी मटण शॉपमध्ये गॅस स्टोव्ह वापरून बकऱ्याचे पाय जाळण्याचे काम केले जात असल्याने संभाव्य दुर्घटनेची भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

खारघर सेक्टर-१४ मधील मटण विक्री दुकानाच्या अगदी शेजारी वीज पेटी, वीजवाहक तारा आणि इतर विद्युत उपकरणे असून, व्यावसायिकाने त्याच परिसरात स्वतःचे साहित्य ठेवण्याची तसेच बसण्याची व्यवस्था केली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे आग लागणे, शॉर्टसर्किट होणे किंवा अन्य विद्युत अपघात होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. खारघर सेक्टर-१४ मधील मार्केटमध्ये नागरिकांची मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## गरजू विद्यार्थ्यांना लॅम्प लाईटचे वाटप

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**
शहरी भागात विजेची समस्या फारशी जाणवत नसली तरी ग्रामीण भागात मात्र रात्री अंधारामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान होते. विशेषतः पावसाळ्यात ही अडचण अधिक वाढते. ही बाब लक्षात घेऊन श्री शिव युवा प्रतिष्ठान, श्री क्षेत्र कळंबोशी यांच्या वतीने आज कळबोशी गाव आणि खैरवाडी आदिवासीवाडीतील गरजू विद्यार्थ्यांना लॅम्प लाईटचे वाटप करण्यात आले.

शिव युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून सामाजिक कार्यात पुढाकार घेतला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अंधारात बसावे लागू नये हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमासाठी संकल्पना मांडून ती प्रत्यक्षात आणणारे प्रतिष्ठानचे सचिव विपुल भिलारे यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच अशा सामाजिक उपक्रमांना नेहमीच पाठबळ देणारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक हुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यात कळंबोशी रहिवाशी सेवा संघ नेहमीच सहकार्य करीत आहे. त्यांचे मार्गदर्शन आणि साथ यापुढेही कायम राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमप्रसंगी संतोष वरगडे, गजानन गायकवाड, सुंदर भिलारे, महेंद्र शिर्के यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. वेळात वेळ काढून उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे शिव युवा प्रतिष्ठानच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. शिव युवा प्रतिष्ठानमधील सर्व बंधूंच्या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी कौतुक केले.

# मुलभूत गरजांसाठी आंदोलनाची हाक

**● शाळा, स्मशानभूमी, बेकायदेशीर टेपरा आणि रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात संताप**

**। उरण । प्रतिनिधी ।**
उरण शहरातील बोरी-कुंभारवाडा परिसर गेल्या तब्बल दहा वर्षांपासून मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असल्याचा आरोप करत येथील नागरिकांनी अखेर आक्रोश धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, पथदिवे, स्मशानभूमी, कथित अनधिकृत मोबाईल टॉवर, बेकायदेशीर काँक्रीटचा टेपरा, डासांचा वाढता प्रादुर्भाव आणि वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर प्रश्नांवर रविवारी (दि. १२) सकाळी १० वाजता एनएमएमटी बसस्टॉप येथे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

मात्र आंदोलनापूर्वीच एक प्रश्न चर्चेचा विषय ठरला आहे. ज्या दिवशी नगरपरिषद, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर बहुतांश शासकीय कार्यालयांना साप्ताहिक सुट्टी असते, त्याच रविवारी आंदोलन करण्यामागचे नेमके कारण काय? अधिकारी आणि निर्णयक्षम यंत्रणा उपस्थित नसताना आंदोलनाचा अपेक्षित परिणाम होणार का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

बोरी-कुंभारवाडा परिसरात उरण एज्युकेशन सोसायटी आणि रोटरी इंग्लिश मीडियम स्कूल या दोन मोठ्या शैक्षणिक संस्था असून हजारो विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. मात्र या शाळांकडे जाणारा मुख्य रस्ता मोठमोठ्या खड्ड्यांनी दयनीय झाला आहे. रस्त्यालगतच्या नाल्याची संरक्षण भिंत कोसळल्याने रस्ताच खचला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

परिसरातील गटार व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून अनेक ठिकाणी सांडपाणी थेट रस्त्यावर आणि घरांमध्ये शिरत आहे. पाणीपुरवठा अनियमित असून अनेक पथदिवे महिनोनमहिने बंद असल्याने रात्री नागरिकांना अंधारातून मार्ग काढावा लागत आहे. परिसरात उभारण्यात आलेल्या कथित अनधिकृत मोबाईल टॉवरविरोधात नागरिकांनी वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनही कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून शासनाच्या महसुलालाही फटका बसत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

वैष्णवी हॉटेलसमोर कथित बेकायदेशीर काँक्रीटमुळे कायम स्वरूपी वाहतूक कोंडी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांचा आरोप आहे की, गेल्या दहा वर्षांत नगरपरिषदेकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनही या भागाकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. कर आम्ही भरतो; सुविधा मात्र मिळत नाहीत, अशी संतप्त भावना व्यक्त होत आहे.

## रिक्षाची चोरी

पनवेल : पनवेल शहर रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजीनगर येथील ५० नंबर बसस्टॉप परिसरातून रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. यामुळे रिक्षाचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीस गेलेली रिक्षा नुकतीच नव्याने तयार करण्यात आली होती. रिक्षेमध्ये साऊंड सिस्टीम व स्पीकरचीही व्यवस्था करण्यात आली होती. रिक्षा चोरी झाल्यानंतर मालकांनी परिसरात शोधाशोध सुरू केली असून नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित रिक्षा कोणाला आढळल्यास अथवा तिच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## स्व. तात्यासाहेब टके चौकात भरला आठवडा भाजी बाजार

**नागोठणे :** अंबा नदीला पूर आल्यामुळे नागोठणे शहरात एसटी स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, बाजारपेठ, कोळीवाडा, मच्छी व मटण-चिकन मार्केट परिसर आदी ठिकाणी सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. नागोठण्यातील आठवडा बाजार दर रविवारी भरत असलेल्या मैदानावर तर पुराच्या पाण्याने वेढा घातला होता. परिणामी आठवडा बाजारात भाजीची दुकाने लावणाऱ्या भाजी विक्रेत्यांनी तसेच नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील भाजी विक्रेत्यांनी नागोठण्यातील तत्कालीन ज्येष्ठ समाजसेवक स्व. पांडुरंग गोविंद उर्फ तात्यासाहेब टके चौकाचा आधार घेतला.

# हुल्लडबाजांवर खेड येथे धडक कारवाई

**। रोहा । प्रतिनिधी ।**
मंगला लक्षद्वीप एक्स्प्रेसच्या महिला राखीव डब्यात बेकायदेशीरपणे प्रवेश करून सिगारेट ओढणे, गुटखा खाणे आणि महिला प्रवाशांना त्रास देणाऱ्या हुल्लडबाज तरुणांविरोधात कोकण रेल्वे प्रशासनाने तातडीने धडक कारवाई केली. खेड रेल्वे स्थानकावर रेल्वे सुरक्षा बलाच्या मदतीने संबंधित तरुणांना डब्यातून बाहेर काढून त्यांच्यावर रेल्वे कायद्यानुसार कारवाई करण्यात आली.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेशी संबंधित हा संतापजनक प्रकार समोर आल्यानंतर रविवारी सकाळी साडेआठच्या सुमारास याबाबतची माहिती प्रसारित झाली. त्यानंतर कोकण रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी तातडीने दखल घेत संबंधित यंत्रणेशी संपर्क साधला. ट्रेन रोहा स्थानक सोडून पुढे गेल्याने पुढील प्रमुख स्थानक असलेल्या खेड येथे कारवाईची आखणी करण्यात आली.

एर्नाकुलमहजरत निजामुद्दीन मंगला लक्षद्वीप एक्स्प्रेस खेड स्थानकात दाखल होताच आधीपासून तैनात असलेल्या रेल्वे पोलीसांच्या पथकाने महिला डब्यावर धडक कारवाई केली. पोलिसांना पाहताच डब्यातील काही प्रवाशांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, रेल्वे पोलिसांनी डब्याला वेढा घालून बेकायदेशीरपणे महिला डब्यात प्रवास करणाऱ्या आणि महिला प्रवाशांना त्रास देणाऱ्या सर्व संबंधितांना ताब्यात घेतले.

काही तरुण महिला डब्यात सिगारेट ओढत होते तसेच गुटखा खाऊन धूर व दुर्गंधीमुळे महिला प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे महिला प्रवाशांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. याची गंभीर दखल घेत कोकण रेल्वे प्रशासनाने त्वरित कारवाईचे आदेश दिले.रेल्वे सुरक्षा बलाने संबंधित आरोपींविरोधात रेल्वे कायद्यानुसार गुन्हे नोंदवून पुढील प्रक्रिया सुरू केली आहे. कारवाईनंतर महिला प्रवाशांनी सुटकेचा श्वास घेतला.

महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. कोकण रेल्वे प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या वेळेवर झालेल्या कारवाईमुळे अनुचित प्रकार टळला असून महिला राखीव डब्यांमध्ये नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहतील, असे संकेत या घटनेतून मिळाले आहेत. महिला डब्यात हुल्लडबाजी करणाऱ्या या तरुणांवर कारवाई करणाऱ्या रेल्वे पोलिसांचे आणि तात्काळ दखल घेणारे रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांचे कौतूक करण्यात येत आहे.

**२४ हून अधिक गरीब कुटुंबांची घरे उद्ध्वस्त | सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही**

# चौकुळच्या मऱ्हाटवाडी-बेरडकीवर वादळाचा घाला

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**
सावंतवाडी तालुक्यातील चौकुळ गावातील मऱ्हाटवाडी-बेरडकी येथे निसर्गाने अक्षरशः थैमान घातले. भल्या पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास प्रचंड वेगाने सुटलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण केली. या वादळाच्या तडाख्यात २४ हून अधिक गरीब कुटुंबांची घरे काही क्षणांत उद्ध्वस्त झाली असून, एका वृद्धाचे घर पूर्णपणे कोसळले



आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र अनेक कुटुंबांचे आयुष्यभराचे कष्ट काही मिनिटांत मातीमोल झाले आहेत.

शनिवारी मध्यरात्री गाढ झोपेत असताना अचानक वादळाने झोडपायला सुरुवात केली. घरांवरील सिमेंटचे पत्रे हवेत उडाले, तर कौलारू घरांची छपरे छिन्नविच्छिन्न झाली. अचानक आलेल्या या संकटामुळे झोपेत असलेली लहान मुले, महिला आणि वृद्ध जीव मुठीत धरून घराबाहेर धावले. मऱ्हाटवाडी-बेरडकीतील बहुतांश घरे ७० ते ८० वर्षे जुनी, मातीची व कौलारू असल्याने वादळाचा सर्वाधिक फटका या कुटुंबांना बसला. आंबोली परिसरात सध्या मुसळधार पाऊस सुरू असल्याने, छप्पर उडालेल्या या नागरिकांसमोर आता डोक्यावर छप्पर शोधण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

या भीषण आपत्तीत सप्तवती पांडुरंग नाईक, ज्ञानेश्वर वसंत नाईक, एकनाथ वसंत नाईक, कृष्णा पुंडलीक नाईक, संदीप नामदेव नाईक, आनंद नामदेव नाईक, उत्तम लक्ष्मण नाईक, रमेश लक्ष्मण नाईक, परशुराम मारुती नाईक, चंद्रकांत दत्ताराम नाईक, संजय तुकाराम नाईक, मधू मश्नु नाईक, सकराम मश्नु नाईक, कृष्णा दत्ताराम नाईक, संतोष दत्ताराम नाईक, पांडुरंग दत्ताराम नाईक, बाबू नाईक, सुरेश नाईक, सोम बुधाजी नाईक, यशवंत बुधाजी नाईक, संजय प्रभाकर नाईक, भिरू सखाराम नाईक, पांडुरंग नाईक आणि तानाजी नाईक यांच्या घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बाधित वाडीतील बहुतांश नागरिक हे रोजंदारी आणि मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात.

## निवडक



### भुईबावडा घाटात दरड कोसळली

**सावंतवाडी** : सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे वैभववाडी तालुक्यातील भुईबावडा घाटात दरड कोसळल्याची घटना घडली आहे. डोंगराचा कडा खचून मोठ्या प्रमाणावर मुरूम आणि माती रस्त्यावर आल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे थांबली आहे. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. पावसामुळे भुईबावडा घाटातील माती भुसभुशीत झाली होती. आज अचानक घाटातील मुख्य रस्त्यावर दरड कोसळली. सुदैवाने दरड कोसळली त्या क्षणी तिथून कोणतेही वाहन जात नसल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. मात्र, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ढिगारा साचल्याने सुरक्षिततेचा उपाय म्हणून प्रशासनाने दोन्ही बाजूची वाहतूक तात्काळ थांबवली आहे. घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभाग पथके घटनास्थळी पोहचत आहेत. रस्त्यावरील मुरूम, माती आणि डोंगराचा मलबा बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर हातात घेतले जात आहे. घाटात साचलेला मलबा हटवण्याचे काम वेगाने सुरू आहे. हा ढिगारा पूर्णपणे काढून रस्ता सुरक्षित केल्यानंतरच या मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत केली जाईल,अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.



### तरुणाईच्या उत्साहात रंगला 'भूतमभय'

**पनवेल** : मराठीतील आगामी हॉरर-कॉमेडी चित्रपट भूतम भय सध्या चांगलाच चर्चेत आहे. भन्नाट कथा, नव्या पिढीतील लोकप्रिय कलाकार आणि हटके सादरीकरणामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. नुकतंच चित्रपटातील पैशाचा पाऊस रॅप प्रदर्शित झालं असून, त्याचा म्युझिक लॉन्च रसायनी येथील पिल्लई महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आणि जल्लोषात पार पडला. या वेळी पिल्लई महाविद्यालयाच्या संचालक पीआर, पल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, डॉ. निवेदिता श्रेयन्स, प्रिन्सिपल डॉ.जे.व्ही.बकाल, डॉ. अमर मांगे, डॉ. रिंकू शंतनू, डॉ.केतन, विरारचे अमृत देशपांडे आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या खास कार्यक्रमासाठी चित्रपटाची संपूर्ण टीम महाविद्यालयात उपस्थित होती. विद्यार्थ्यांनी कलाकारांचं जोरदार स्वागत केलं. गाणं प्रदर्शित होताच सगळीकडे एकच उत्साहाचं वातावरण निर्माण झालं. विद्यार्थी गाण्याच्या तालावर नाचू लागले, जल्लोष करू लागले आणि संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी भूतम भय मधील गाण्यावर खास डान्स सादर करून टीमला सुखद सरप्राइज दिलं. कलाकारांनीही विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.



### रेशनिंग उत्पन्न मर्यादा वाढीसाठी निदर्शने

**रायगड** : रेशन कार्डसाठी लागू असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे तसेच उत्पन्न मर्यादा ओलांडल्याच्या कारणावरून रेशन कार्ड रद्द करण्याची कारवाई तातडीने थांबविण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे रेशनिंग कृती समितीच्या वतीने निदर्शने करण्यात आली. शहरी भागासाठी सध्या अस्तित्वात असलेले ५९ हजार वार्षिक उत्पन्न ऐवजी ३ लाख ६० हजार रुपये वार्षिक उत्पन्न मर्यादा तसेच ग्रामीण भागासाठी वार्षिक ४४ हजार ऐवजी २ लाख ४० हजार वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत ५०० सह्यांचे अर्जासोबत मागण्याचे निवेदन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव अत्राम यांची भेट घेऊन सादर करण्यात आले. यावेळी शासनाच्या वतीने रेशन कार्ड उत्पन्न मर्यादा वाढीबाबत नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल येत्या १५ दिवसांत प्रकाशित करण्यात येईल. उत्पन्न मर्यादीच्या कारणावरून रेशन कार्ड रद्द करण्याची सुरू असलेली प्रशासकीय कारवाई थांबविण्यासाठी परिपत्रक जारी करण्यात येईल, असे सांगण्यात आले. दरम्यान आंदोलनस्थळी भेट देणारे नामदार गिरीश महाजन, दादा भुसे आणि विधान परिषद आमदार मनीषा कायंदे यांनीही आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत भेट घेतली.

### खारघरमधील घरांना लागली गळती

**पनवेल** : सिडकोने खारघर, सेक्टर-४० येथे उभारलेल्या भोगेश्री इमारतींमधील अनेक घरांमध्ये पावसाळा सुरू होताच छत आणि भिंतीमधून पाणी गळती होत असल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. घरांच्या छतांमधून, भिंतींच्या सांध्यातून तसेच खिडक्यांच्या बाजूने पाणी झिरपत असल्याने अनेक कुटुंबांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सिडकोने खारघरमध्ये उभारलेल्या सेक्टर-४० मधील भोगेश्री गृह प्रकल्पातील घरे रहिवाशांना ताब्यात देऊन ५ वर्षे झाली आहेत. मात्र, दरवर्षी पावसाळ्यात सोसायटीमधील अनेक घरांना गळतीची समस्या निर्माण होते. गेल्या ४ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे सोसायटीमधील जवळपास १० ते १५ घरांना गळती लागून पावसाचे पाणी शिरल्याने भिंतीवरील रंग उखडणे, प्लास्टर निघणे, फर्निचर, बेड तसेच इतर घरगुती वस्तूंचे नुकसान होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. सदर इमारतींच्या बांधकामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत रहिवाशांनी सिडकोकडे वारंवार तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप कायम स्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

। रायगड । प्रतिनिधी ।

**जून महिन्यापर्यंत मुंबई गोवा महामार्गाचे उर्वरीत काम पूर्ण होईल आणि कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास निर्विघ्न होईल असा विश्वास केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला होता. पण महामार्गाचे काम जुलै महिना उजाडला तरी पूर्ण झाले नाही, अपुर्ण काम असलेल्या ठिकाणी रस्त्याची दुरवस्था होण्यास सुरूवात झाली आहे. नागोठणे आणि गडब परिसरात महामार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. तर पुलांची कामही अपूर्ण आहे. त्यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.**



गेल्या पंधरा वर्षांपासून पळस्पे ते इंदापूर मार्गाचे काम अपूर्णावस्थेत आहे. या वर्षी हे काम पूर्ण होईल आणि कोकणवासियांचा प्रवास सुखकर होईल अशी अपेक्षा होती. मात्र ठेकेदारांच्या निष्क्रीयतेमुळे याही वर्षी कोकणची वाट खडतरच असल्याचे चित्र सध्या महायला मिळत आहे. महामार्गावर नागोठणे जवळील कोलेटी येथे उड्डाण पूल उभारणीचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे महामार्गावरील प्रवाशांना सध्या सर्व्हिस मार्गांचा वापर करावा लागत आहे. या सर्व्हिस मार्गिकांची सध्या मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे.

महामार्गावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे चालकांना खड्ड्यामधून आदळत आपटत पुढील मार्गक्रमण करावे लागत आहे. या ठिकाणच्या रस्त्याची सध्या दयनीय अवस्था आहे. खड्ड्यांमधील खडी बाहेर आली आहे.

त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. त्यामुळे या परिसरातून मार्गक्रमण करतांना चालकांना कसरत करावी लागत आहे. पाणी साचलेल्या खड्ड्यामधून वाहने चालवतांना अंदाज येत नसल्याने वाहने आपटण्याचे प्रमाण वाढले आहे.

या परिसरातील उड्डाण पुलाचे काम हे मे अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. सद्यस्थिती लक्षात घेतली तर हे काम लवकर पूर्ण होण्याची चिन्हही दिसत नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात कोकणात जाणाऱ्या प्रवाश्यांची वाट खडतरच राहण्याची चिन्ह आहेत. वडखळ येथून अलिबागच्या दिशेने जाणाऱ्या सर्व्हीस मार्गिकेची सध्या मोठ्या प्रमाणात दुरावस्था आहे.

पेव्हर ब्लॉक बसवून या मार्गाची मलमपट्टी करण्यात आली होती. मात्र आता पेव्हर खचून ठिकठिकाणी खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे वाहन चालवणे कठीण जात आहे. त्यामुळे वाहन चालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. महामार्गावर गडब परिसरातही महामार्गाची पुरती दुर्दशा झाली आहे.

महामार्ग प्राधिकरणाने या ठिकाणी सिमेंटच्या रस्त्यावर डांबरीकरण करून खड्डे भरण्याचा प्रयत्न केला होता. पण पावसामुळे डांबरीकरण वाहून गेल्याने, रस्त्या मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाला आहे. कोलेटी येथील पूलाचे काम गेली अनेक वर्ष अपूर्ण स्थितीत आहे. त्यामुळे सर्व्हिस रोडवरून वाहतूक वळविण्यात आली आहे.

या सर्व्हिस रोड्सच्या देखभाल दुरुस्तीकडे महामार्ग प्राधिकरण अजिबात लक्ष्य देत नाही. त्यामुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून, येथे वाहने चालवणे मुष्कील झाले आहे.

## निवडक



### मुरुड नगरपरिषदेला अग्निशमन वाहने

**आगरदांडा :** सर्वसाधारण वार्षिक जिल्हा योजना २०२५-२०२६ अंतर्गत अग्निशमन सेवा व आणीबाणी सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत विशेष बाब म्हणून मुरुड-जंजिरा नगर परिषदेला ५००० लिटर क्षमतेचे एक तसेच २००० लिटर क्षमतेचे एक अशी दोन अत्याधुनिक अग्निशमन वाहने प्राप्त झाली आहेत. या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा आराधना दांडेकर आणि मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की या वाहनांमुळे मुरुड शहरासह परिसरातील आग, नैसर्गिक आपत्ती व इतर आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देणे अधिक सक्षमपणे शक्य होणार आहे. नव्याने प्राप्त झालेल्या या दोन अत्याधुनिक अग्निशमन वाहनांमुळे शहरातील अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन सेवा अधिक गतिमान, सक्षम व परिणाम कारक होणार असून नागरिकांना अधिक सुरक्षित आणि तत्पर आपत्कालीन सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. सदर अग्निशमन वाहनांची बांधणी कॉन्टीप्रो इंडस्ट्रीज, चाकण यांनी अत्याधुनिक तांत्रिक सुविधांसह केली असून अग्निशमन कार्यासाठी आवश्यक उपकरणे तसेच साधनसामग्री या वाहनांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.



### पळस्पे ग्रामपंचायतीवर धडक मोर्चा

**पनवेल :** गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या तीव्र पाणीटंचाईला कंटाळून आज पळस्पे ग्रामस्थ आणि संतप्त महिलांनी ग्रामपंचायतीवर जनआक्रोश मोर्चा काढला. पाणी आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं, ग्रामपंचायत प्रशासनाचा धिक्कार असो अशा घोषणा देत शेकडो नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला वेढा घातला. आंदोलक महिलांनी ग्रामपंचायतीच्या दारात घोषना देऊन प्रशासनाचा तीव्र निषेध केला.पळस्पे गावात गेल्या काही महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. नळांना पाणी येत नसल्याने नागरिकांना विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. ग्रामसेवक ग्रामपंचायतमध्ये चार चार दिवस येत नाहीत, ग्रामसेवक फोन घेत नाहीत प्रशासक लक्ष देत नाहीत, ग्रामपंचायत कर्मचारी उडवा उडवीची उत्तरे देत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने शेवटी गावकऱ्यांचा संयम सुटला आणि आज ग्रामपंचायत ऑफिस समोर जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. आम्ही दरमहा पाणीपट्टी वेळेवर भरतो, मग आम्हाला पाण्यासाठी वणवण का करावी लागते? प्रशासनाला आम्हाला पाणी न मिळाल्याने जो त्रास होतो त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही, असा संतप्त सवाल आंदोलक महिलांनी उपस्थित केला.



### फॅशन डिझायनिंग केंद्राचे उद्घाटन

**धाटाव :** एम. बी. मोरे फाऊंडेशनच्या इंग्लिश मीडियम स्कूल, धाटाव येथे रिव्हिया फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. एम बी मोरे फाऊंडेशनच्या स्कूल आणि महाविद्यालयातील इयत्ता पाचवी ते सिनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी फॅशन डिझायनिंग, शिवणकला व संबंधित कौशल्य देण्यासाठी मोफत प्रशिक्षण येथे लवकरच सुरू होणार आहे. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनिंग, शिवणकला आणि कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून देत या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि स्वयंरोजगाराची क्षमता विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनिंग, शिवणकला तसेच विविध व्यावहारिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

### ॲक्युपंक्चर उपचारकांचा होणार गौरव

**कोर्लई :** इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन आणि आयुष ग्लोबल मेडिकल असोसिएशनने राज्यातील ॲक्युपंक्चर उपचारकांसाठी भव्य महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार सन्मान सोहळा आयोजित केला आहे. यात रायगड जिल्ह्यातील चौघांची निवड झाली असून मुरुड तालुक्यातील विजय चंद्रकांत तांबडकर व सिध्देश गजानन बैकर, खोपोलीतील अर्चना विनोद सावंत व पनवेल येथील वंदना पृथ्वीराज यशवंते यांचा समावेश आहे. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी (दि.१९) महा अक्युपंक्चर रत्न पुरस्कार सोहळा संपन्न होणार असून यात राज्यातील अक्युपंक्चर उपचारकांचा गौरव करण्यात येणार आहे. मिशन विजय अंतर्गत आरोग्य व क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे ॲक्युपंक्चर, योग निसर्गोपचार उपचारक मास्टर विजय तांबडकर, सिध्देश बैकर, वंदना यशवंते, अर्चना सावंत यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मुरुड न.प.च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड जंजिरा नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या शहरातील विविध ठिकाणी ५ मराठी शाळा असुन या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, बालकल्याण सभापती नगमाना खानजादे, पर्यटन विकास नियोजन सभापती रुपेश रणदिवे, नगरसेवक मनिष विरुकुड, अंकीता गुरव, प्रणव दिवेकर, मुख्याध्यापिका कल्पना पेणकर, महेंद्रकुमार हावरे, राकेश राखडे, संजना म्हात्रे, आदिंसह विद्यार्थी उपस्थित होते.



मुरूड जंजिरा नगरपरिषद शिक्षण मंडळाची शाळा क्रमांक ३ मध्ये मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत व मान्यवरांच्या यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटत करण्यात आले.

मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की, शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शालेय साहित्य ही विद्यार्थ्यांची अत्यावश्यक गरज असते. आज विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आणि इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी अधिक उत्साह निर्माण होईल आणि त्यांना आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे मत यावेळी विरेंद्र भगत यांनी व्यक्त केले.

# खड्ड्यांविरोधात वाहतूक पोलिसांचा पुढाकार

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।



पनवेल शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वत: रस्त्यावर उतरून खड्डे बुजविण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अमित साबळे व पोलीस अंमलदार भोळे यांनी मुसळधार पाऊस आणि चिखलाची पर्वा न करता फावडे हाती घेत धोकादायक खड्ड्यांमध्ये खडी-मुरूम टाकून तात्पुरती डागडुजी केली.

या घटनेच्या निमित्ताने संबंधित विभागाने रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती तातडीने करावी, अशी मागणी नागरिक व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

# लाडवलीच्या कुमार चैतन्य गायकवाडचे घवघवीत यश

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील लाडवली गावचा विद्यार्थी चैतन्य ज्ञानोबा गायकवाड नवयुग मराठी माध्यमिक विद्यालय लाडवली येथे शिकणारा पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत ग्रामीण भागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकताच अंतिम निकाल जाहीर केला असून, यामध्ये चैतन्यच्या या यशाने लाडवली गावासह संपूर्ण महाड तालुक्याची मान उंचावली आहे.

चैतन्यने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळवले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे यश प्रेरणादायी ठरत असून, प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.



**● अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने शनिवारी सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या समाधीस्थळी २९७ व्या स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा अक्षया नाईक, रघुजीराजे आंग्रे, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.**

# ब्लू जेटच्या ११ कुटुंबियांना ५ लाखांची मदत

। महाड । प्रतिनिधी ।

२०२३ साली महाड एमआयडीसीतील ब्लू जेट हेल्थकेअर कंपनीत झालेल्या भीषण स्फोटात मृत्यू पावलेल्या ११ कामगारांच्या कुटुंबियांना आज अखेर न्याय मिळाला. राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच शासनाने या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.



महाड येथील प्रांत कार्यालयात मंत्री गोगावले यांच्या हस्ते मृत कामगारांच्या नातेवाईकांना धनादेशांचे वितरण करण्यात आले.

या घटनेनंतर आमदार असताना भरत गोगावले यांनी घटनास्थळी जाऊन पीडित कुटुंबियांना शासनाकडून मदत मिळवून देऊ असे आश्वासन दिले होते. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे थेट मागणी केली. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत समन्वय ठेवून हा विषय मंत्रिमंडळापर्यंत नेला.

यावेळी मंत्री गोगावले म्हणाले, ३ वर्षांपूर्वी मी या कुटुंबियांना शब्द दिला होता. खाजगी कंपनीतील कामगार असले तरी ते आपलेच आहेत. त्यांच्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडणार नाही. आज तो शब्द पूर्ण झाला याचा मला आनंद आहे. ही मदत म्हणजे शासन त्यांच्या पाठीशी आहे याचा संदेश आहे.मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत प्रांताधिकारी पोपट ओमासे आणि तहसीलदार महेश शितोळे यांच्यासमवेत काम गारांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाखांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

# विद्यार्थिनींना आरोग्याविषयी मार्गदर्शन

। उरण । प्रतिनिधी ।

एन. आय. हायस्कूल येथे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनींना मासिक पाळी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्था, उरण आणि शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी, योग्य सॅनिटरी नॅपकिनचा वापर तसेच गैरसमज दूर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ९५ विद्यार्थिनींना कॉटनचे सॅनिटरी नॅपकिन मोफत वितरित करण्यात आले.



कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी या उपयुक्त उपक्रम ाबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे आरोग्य जनजागृती उपक्रम नियमितपणे आयोजित करण्याची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

**पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू | पर्यटकांना सूचना पालन करण्याचे आवाहन**

# माथेरान घाटातील धबधबा प्रवाहित

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान घाटात धबधबा प्रवाहित झाला असून मुसळधार पावसामुळे जुम्मापट्टी धबधबा झाला आहे. रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध निसर्गरम्य पर्यटनस्थळ माथेरान येथे गेल्या तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण डोंगररांग जणू हिरवाईने नटली असून घाटमाथ्यावरचे सर्व धबधबे प्रवाहीत झाले आहेत. पावसाच्या सततच्या सरींमुळे माथेरान घाटात निसर्गाचा अप्रतिम देखावा फुलला असून पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.



माथेरान येथे पावसाळ्यात निसर्ग आपल्या सर्वोच्च सौंदर्यात फूलून येतो. यंदाही त्याला अपवाद नाही. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे माथेरानच्या डोंगररांगेतील झाडे, दऱ्या-खोऱ्या आणि घाट परिसर हिरवागार झाला आहे. त्यातच घाटमाथ्यावरून कोसळणारे पांढरे शुभ्र धबधबे या परिसराच्या सौंदर्यात भर घालत आहेत. विशेष म्हणजे माथेरान घाटाच्या बाजूला असलेला जुम्मापट्टी धबधबा सध्या जोरात प्रवाहीत झाला असून, तो पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहे. घाटातून माथेरानकडे जाणाऱ्या पर्यटकांना हा धबधबा अगदी जवळून पाहता येत असल्याने अनेक पर्यटक येथे थांबून फोटो-व्हिडिओ काढताना आणि निसर्गाचा मनमुराद आनंद घेताना दिसत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे लहान-मोठे सर्वच धबधबे सक्रिय झाले आहेत. डोंगराच्या कड्यावरून कोसळणारे पाण्याचे प्रवाह, आजूबाजूची दाट हिरवाई आणि सतत पसर-लेले धुके यामुळे संपूर्ण परिसर एखाद्या चित्रपटातील दृश्याप्रमाणे भासू लागला आहे. त्यामुळे मुंबई, पुणे तसेच आसपासच्या भागातून मोठ्या प्रमाणात पर्यटक माथेरानकडे आकर्षित होत आहेत.दरम्यान, घाटमाथ्यावर पडणाऱ्या दाट धुक्यामुळे काही वेळा हे धबधबे पूर्णपणे नजरेआड होतात. मात्र, धुक्यातून अधूनमधून डोकावणारे हे पांढरे शुभ्र धबधबे पर्यटकांना एक वेगळाच रोमांचक अनुभव देतात.

स्थानिक व्यावसायिकांसाठीही हा पावसाळा आनंदाचा ठरत असून पर्यटकांची वाढती वर्दळ त्यांच्या व्यवसायाला चालना देत आहे. हॉटेल, लॉज, घोडेस्वारी तसेच स्थानिक पर्यटन सेवांना चांगली मागणी निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे घाटातील काही ठिकाणी घसरडी परिस्थिती निर्माण होत असल्याने पर्यटकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्रशासनाकडूनही पर्यटकांना सुरक्षिततेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# कर्जतच्या श्रीराम पुलाचे लोकार्पण




**नवीन श्रीराम पुलाचे लोकार्पण सोहळ्याच्या वेळी धुवाधार पाऊस पडत होता तरी कर्जतकरांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती.**

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात सुमारे दोन - अडीच हजार फार्म हाऊस आहेत. त्यामुळे शनिवार-रविवार नव्हे तर नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक कोंडीची समस्या सुटवी आणि कर्जतच्या विकासाला अधिक चालना मिळावी. यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी उल्हास नदीवरील जुन्या श्रीराम पुलाच्या शेजारी नवीन श्रीराम पूल उभारण्यासाठी प्रयत्न केले. त्या पुलाचे आज लोकार्पण करण्यात आले. सहा कोटी तीस लाख रुपये खर्च करुन हा पूल उभारण्यात आला आहे.

नवीन श्रीराम पुलाचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, गटनेते संकेत भासे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, उप अभियंता राहुल देवांग, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नरेश पाटील,उ पसभापती भाई शिंदे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, नरेश मसणे, भाई गायकर, संभाजी जगताप, विजय पाटील, माजी नगराध्यक्ष शरद लाड, माजी सभापती तानाजी चव्हाण, माजी उपगराध्यक्ष अशोक ओसवाल, दीपक बेहेरे, राजेश भगत, सुदाम पवाळी आदी उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आमदार महेंद्र थोरवे यांनी, या श्रीरामपूर भूमिपूजन माझ्या हस्ते झालेले होते. आणि हा श्रीरामपूल व्हावा म्हणून कर्जतकरांची मागणी असताना आज सांगायला अभिमान वाटतोय की ज्या श्रीरामपुलाचे भूमिपूजन आम्ही केलेलं होतं त्या श्रीराम पुलाचे उद्घाटन आमच्या हस्ते या ठिकाणी होत आहे. या गोष्टीचा सार्थ अभिमान आम्हाला आहे. हा पूल कमानीचा असल्याने तो पूर्ण व्हायला थोडा वेळ लागला. जगाची अर्थ व्यवस्था मी पाहिलेली आहे. सिंगापूर, मलेशिया, थायलंड या सगळ्या देशांची अर्थव्यवस्था ही फक्त आणि फक्त पर्यटनावर चालत असते आणि म्हणून माझ्या कर्जत तालुक्यातील सुद्धा अर्थव्यवस्था ही पर्यटनावर चालावी. यासाठी पर्यटनाला प्राधान्य देण्याचं काम करीत आहोत. असे स्पष्ट केले.

रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी, हा पूल उभारण्यासाठी तीन वर्षे लागली असली तरी पुलाचे काम चांगले झाले आहे. रोजगार हमी योजनेचे आता नामांतरण झालेले आहे आणि व्हीव्हीजी रामजी या नवीन संकल्पनेतून आपण आता काम करतोय. या विभागा मार्फत मंगळवारी कार्यशाळा ठेवलेली आहे. आमदार म्हणून तुम्ही आवर्जून उपस्थित राहावे. त्या दिवशी जो उपस्थित असेल त्यालाच प्रथम निधी मिळणार आहे. असे स्पष्टपणे सांगितले. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.

याप्रसंगी नगरसेवक रामदास गायकवाड, किशोर कदम, वैभव सुरावकर, संतोष शेलार, अरुणा वायकर, कोयल कन्हेरीकर, जान्हवी देवघरे, सुरेखा शितोळे, सुचिता वांजळे, भास्कर दिसले, रत्नाकर बडेकर, अरुण देशमुख, नदीम खान, ज्ञानेश्वर करणूक, दिनेश कडू, योगेश थोरवे आदी उपस्थित होते.




## चेन पोलिसांच्या मदतीने परत

**नवीन पनवेल :** आदई गाव येथे राहणारे नवीन लग्न झालेले आर्या सावंत या सायंकाळी त्यांच्या पतीसह जोगेश्वरी ते आदई गाव असे कॅबने प्रवास करून घरी आले असता त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चेन कुठेतरी पडल्याचे लक्षात आले. त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात येऊन कळविल्यानंतर सदर कॅब चालक अनिकेत गाढवे यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्या त्या कॅब कारची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये सदर सोन्याची चैन मिळून आली आहे. सोन्याची चैन संबंधितांना परत केली आहे. त्यासाठी पोलीस हवालदार शिवानंद पुजारी व किशोर भोई यांनी प्रयत्न केले.

# कामगारांसाठी १० ऑगस्टला जेलभर आंदोलन

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने चार श्रम संहिता लागू करू नका व इतर मागण्यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर महाधरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भर पावसातही पाच हजार कामगारांनी सहभाग नोंदविला. यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याबरोबर झालेल्या चर्चेत ८ जुलैला कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती बरोबर चार श्रमसंहिता, त्यांचे नियम व कामगारांच्या अन्य मागण्यासाठी विस्तारित बैठक घेण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कृती समितीने महा धरणे आंदोलन स्थगित केले. मात्र महाराष्ट्र सरकारने कामगारांच्या मागण्या मान्य न केल्यास १० ऑगस्टला राज्यभर जेलभरो आंदोलन केले जाईल, असा स्पष्ट इशारा कामगार कर्मचारी संयुक्त कृती समितीचे प्रमुख समन्वयक डॉ. डी . एल. कराड यांनी राज्य सरकारला दिला आहे.

कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना दिलेल्या निवेदनात चार श्रमिक संहिता महाराष्ट्रात लागू करू नये,राज्य सरकारने कामगार संघटनांशी चर्चा करावी, किमान वेतन ३० हजार रुपये करावे, कंत्राटी हंगामी निश्चित कालीन कर्मचाऱ्यांना कायम करावे, योजना कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा व त्यांना ई एसआय, प्रॉव्हिडंट फंड, रजा,बोनस इत्यादी फायदे लागू करावेत, असंघटित कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करून त्यांना निधीची व्यवस्था करावी व त्यामार्फत सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजना लागू कराव्यात. या व इतर मागण्या यावेळी करण्यात आल्या. केंद्र सरकारने चार श्रमसंहिता तसेच नियमही लागू केले आहेत राज्य सरकारनेही नियम प्रस्तावित केले आहेत. या चार श्रमसंहिता व नियमांना कामगार संघटनांचा तीव्र विरोध आहे.

आझाद मैदानावर झालेल्या धरणे आंदोलनात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार, कामगार नेते विवेक मॉन्टेरो, निवृत्ती धुमाळ, संतोष चाळके, सुकुमार दामले, कैलास कदम, रवी जोशी, मिलिंद रानडे, मंगला ठोंबरे, महेश करकेरा, उदय भट, मारुती विश्वासराव, त्रिशीला कांबळे, स्नेहा सावंत, विजय जाधव, विजय तारमाळे, बबली रावत, बजरंग चव्हाण, सईद अहमद इत्यादींनी कामगारांना मार्गदर्शन केले.

# नामफलक नसल्याने नागरिकांची गैरसोय

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील पनवेल ते खोपोली या मार्गावर अनेक गावांचे नामफलक नसल्याने वाहनचालक, प्रवासी तसेच प्रथमच या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते किरण हडप यांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पनवेल ते खोपोलीदरम्यान येणाऱ्या प्रत्येक गावाच्या प्रवेशद्वारावर स्पष्ट, आकर्षक व परावर्तित नामफलक बसविण्यात यावेत, जेणेकरून वाहनचालकांना मार्गदर्शन होईल आणि नागरिकांची होणारी गैरसोय थांबेल, अशी मागणी त्यांनी केली आहे.

> **मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील पनवेल ते खोपोलीदरम्यान अनेक गावांचे नामफलक नसल्याने वाहनचालक, प्रवासी आणि आपत्कालीन सेवांनाही अडचणी येत आहेत. प्रत्येक गावाच्या प्रवेशद्वारावर परावर्तित नामफलक तातडीने बसवावेत. संबंधित प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन नागरिकांची गैरसोय दूर करावी, ही आमची मागणी आहे.**
> **किरण हडप सामाजिक कार्यकर्ते**

## रेवस ते पाली पदयात्रेला प्रतिसाद

**खारेपाट :** तालुक्यातील श्री बल्लाळेश्वर रेवस ते पाली पदयात्रा मंडळ रेवस पदयात्रा व पालखी सोहळ्याला रेवस बोडणी परिसरातील कोळी बांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पदयात्रेचा शुभारंभ श्री राम मंदिर रेवस गाव येथून करण्यात आला. यावेळी रेवस बोडणी परिसरातील प्रतिष्ठित कोळी बांधवांचा सन्मान करण्यात आला. आरसीएफ थळ पीआरओ डिपार्टमेंटचे भोईर यांनी दर्शन घेतले. तसेच आरसीएफ थळ कंपनीचे मंडळास सहकार्य लाभले आहे. पदयात्रेची पहिली वस्ती शिहू, दुसरी वस्ती उन्हेरे, तिसऱ्या दिवशी पहाटे सहा वाजता पदयात्रा श्री बल्लाळेश्वर मंदिर पाली येथे पोहोचली.

# गार्गी हटनेसच्या नव्या प्रकल्पासाठी जनसुनावणी

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील आत्करगाव ग्रामपंचायत हद्दीत कार्यरत असलेल्या मे. गार्गी हटनेस प्रा.लि.कंपनीच्या नव्या प्रकल्पासाठी जनसुनावणी पार पडली. यावेळी कंपनीने नव्याने उभारण्यात येणारा प्लँट प्रदूषणमुक्त असून स्थानिक युवकांना रोजगारामध्ये प्राधान्य दिले जाईल, अशी माहिती ग्रामस्थांना देण्यात आली.

रिशिवन रिसॉर्ट येथे आयोजित या जनसुनावणीस अप्पर जिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत भोसले आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी संजय भोसले उपस्थित होते.कंपनीच्या नव्या प्रकल्पाची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

यावेळी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, माजी उपसरपंच संदीप पाटील, सरपंच विनोद खवले, माजी जिल्हाध्यक्ष मनीष खवले, ग्रामपंचायत सदस्य समीर देशमुख, गणेश पाटील, विजय वाघमारे, चंद्रकांत देशमुख, शिवाजी पाटील, नितीन तवळे, नितीन पाटील तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. जनसुनावणीदरम्यान ग्रामस्थांनी पर्यावरण आणि भूजल संवर्धनासंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. कंपनी परिसरातील किती बोअरवेलच्या पाण्याचे नमुने तपासण्यात आले, याबाबत त्यांनी विचारणा केली. तसेच स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याच्या कंपनीच्या भूमिकेचे स्वागत करताना, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

कंपनीच्या व्यवस्थापनाने आतापर्यंत कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधीतून विविध विकासकामे करण्यात आल्याचे सांगत, भविष्यातही परिसराच्या विकासासाठी सहकार्य सुरू ठेवण्याची ग्वाही दिली. ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या पर्यावरणविषयक प्रश्नांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले. प्रकल्पाबाबत स्थानिकांच्या शंका दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले.


## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल Zuva Organic तर्फे अनवर अहमद चस्ति यानी मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| रियाज अब्दुल करीम बुबेरे | ६५ | १/अ/१ | १-०४-३० | ४-६१ |
| | ६५ | १/ब | ०-४२-०० | ३-७५ |
| | ६६ | १ | १-५५-०० | ८-५१ |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ५/०७/२०२६
**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता.कर्जत, जि.रायगड
मो. - ९८५०७६७५६८


# शासकीय महसूली जमा आता शंभर टक्के ऑनलाईन

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

शासनाने डिजिटल गव्हर्नन्सच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल टाकत शासकीय महसूल जमा करण्याची पूर्वापार चालत आलेली भौतिक चलन पद्धत पूर्णपणे बंद केली आहे. राज्याचा सर्व प्रकारचा महसूल आता शंभर टक्के ऑनलाईन पद्धतीनेच जमा केला जावा, या उद्दिष्टाची कडक अंमलबजावणी सुरू झाली आहे.

वित्त विभागाने जारी केलेल्या निर्णयानुसार बँका, अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागारांमार्फत कोणत्याही स्वरूपात भौतिक चलने स्वीकारली जाणार नाहीत.

शासन तिजोरीत जमा होणाऱ्या रकमांचा भरणा नागरिकांना आणि प्रशासनाला सुलभतेने करता यावा, यासाठी राज्य सरकारने सन २०१० पासूनच ग्रास प्रणाली कार्यान्वित केली होती. या प्रणालीचे संपूर्ण व्यवस्थापन मुंबई येथील आभासी कोषागार कार्यालयाकडून पाहिले जाते. शासनाच्या वेगवेगळ्या सेवांसाठी आकारण्यात येणारे शुल्क जमा करणे, शासनाने दिलेल्या कर्जावरील व्याजाचा भरणा करणे आणि शासन हमीची रक्कम जमा करणे यासारखी सर्व लेखाशीर्षे ग्रास प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. बहुतांश विभागांच्या ऑनलाईन यंत्रणांचे या प्रणालीशी एकत्रीकरण पूर्ण झाले आहे.

या नवीन बदलाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ज्या क्षेत्रीय, विभागीय किंवा मुख्य कार्यालयांची नोंदणी अजूनही ग्रास प्रणालीवर झालेली नाही, त्यांना तातडीने नोंदणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नोंदणी नसलेल्या कार्यालयांना विहित नमुन्यात माहिती भरून ती आभासी कोषागार कार्यालयाकडे पाठवावी लागेल. अंतिम पडताळणीनंतर या कार्यालयांना तात्काळ लॉगिन आयडी आणि पासवर्ड दिले जातील, ज्याचा वापर करून संबंधित कार्यालयांना त्यांचा पासवर्ड बदलून घ्यावा लागेल.

# पुलाखाली साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

मुसळधार पावसामुळे पनवेल येथील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील ओएनजीसी पुलाखाली मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती. पाण्याचा निचरा न झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

पाहणीदरम्यान पाण्याचा निचरा करणाऱ्या पाईपवर डांबर, रेती, माती आणि कचऱ्याचा मोठा साठा झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पाण्याला मार्ग मिळत नसल्याने पुलाखाली पाणी झपाट्याने साचत होते.



घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जेसीबी मशीनच्या सहाय्याने पाईपवरील डांबर, रेती, माती व इतर अडथळे हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर पाण्याला मोकळा मार्ग उपलब्ध करून देण्यात आला.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक सुनिल परशुराम माळी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६७/३ | ००.०४.५० | ००.०६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६ जुलै २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि.
कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५


# गाढी नदीत पाणकुंभीचा विळखा

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

पनवेल कोळीवाडा परिसरातील गाढी नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे नदीत मोठ्या प्रमाणावर पाणकुंभी वाहून येत असून त्याचा फटका कोळी बांधवांना बसत आहे.

सततच्या पावसामुळे कोळी बांधवांनी आपल्या होड्या सुरक्षित राहाव्यात म्हणून त्या झाकून ठेवल्या आहेत. मात्र, नदीत वाहून येणाऱ्या पाणकुंभीच्या मोठ्या पुंजक्यांमुळे मासेमारीसाठी लावण्यात आलेल्या जाळ्यांचे नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी पाणकुंभी जाळ्यांमध्ये अडकून जाळी फाटत असून कोळी बांधवांचे आर्थिक नुकसान होत आहे.

पाणकुंभीमुळे नदीतील पाण्याचा प्रवाहही अडथळाग्रस्त होत असून होड्यांच्या हालचालींमध्ये अडचणी निर्माण होत आहेत.


## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सूचना

याद्वारे सर्व व्यावसायिक/कंत्राटदार...ई यांना सूचित करण्यात येते कि, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील आपत्ति व्यवस्थापनंतर्गत पर्जन्यमापन यंत्राचे ०१ वर्षकरिताचे काळजी निगा देखभाल करणे व त्याकरिता वापरले जाणारे सॉफ्टवेअर यांचे नूतनीकरण करणे आवश्यक असून याकामी इच्छुक संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्याकडुन सदर कामी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.maharshtra.gov.in या दिनांक ०६/०७/२०२६ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र./११३८/२०२६
दिनांक :-०३/०७/२०२६

सही /-
**(कैलास गावडे)**
**उपायुक्त (मुख्यालय-१)**



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# स्मार्ट मीटर बंद करण्यासाठी मनसेचे आंदोलन

- **वाढत्या बिलाने ग्राहक त्रस्त**
- **महावितरणला निवेदन**

। पाली । प्रतिनिधी।

सुधागड तालुक्यातील नागरिक महावितरणच्या स्मार्ट मीटरच्या कारभाराने हैराण झाले असून, या विरोधात मनसे आक्रमक पवित्रा घेतला आहे. वाढत्या वीज बिलांमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे.



या स्मार्ट मीटरची प्रक्रिया कायमची बंद करण्याच्या मागणीसाठी मनसेने सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या पाली विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. येत्या सात दिवसांत स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया न थांबल्यास सुधागड मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुधागड तालुक्यात नवीन स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम राबवली जात आहे. मात्र, या नवीन मीटरमुळे वीज बिलात अनपेक्षित आणि अवाढव्य वाढ झाली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सामान्य ग्राहकांना हजारो रुपयांची बिले येत असल्याने त्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली आहे. या समस्येची दखल घेत तालुक्यातील नागरिकांनी मनसेकडे धाव घेतली आणि स्मार्ट मीटरमुळे होणाऱ्या आर्थिक लूट विरोधात आवाज उठवण्याची मागणी केली.

नागरिकांच्या या मागणीला प्रतिसाद देत, मनसेने तातडीने महावितरणच्या कार्यकारी अभियंता जाधव यांना भेटून सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीत मोठी त्रुटी असून यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी.

जर पुढील सात दिवसांत स्मार्ट मीटर संदर्भातील कोणतीही ठोस कार्यवाही आणि निर्णय न दिसल्यास, सुधागड तालुक्यात मनसेच्या वतीने महावितरण विरोधात तीव्र संघर्ष छेडले जाईल, असा सज्जड दम देण्यात आला. यावेळी मनसे तालुका अध्यक्ष सुनील साठे, दीपेश लहाने, परेश वनगळे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली खुली मिळकत व त्यावरील बंगलो नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल शमीम अहमद अन्सारी यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या खुली मिळकत व त्यावरील बंगलो मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. प्रति | बंगलो नं |
|---|---|---|---|
| श्री.संजीवकुमार व्ही नायर | ३४/७ मोपार कॉम्प्लेक्स | खुली मिळकत ४५०० चौ.फुट व त्यावरील बंगलो क्षेत्र ८८० चौः फुट | २९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं.१०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
ठिकाण: कर्जत

सही/-
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक: ०६/०७/२०२६
मो.नं. ९९२२१५५१५३



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# पावसाचे थैमान...



● गेले दोन दिवस मुरूड तालुक्यात पडत असलेल्या दमदार पावसामुळे रविवारी येथील रस्ते, नद्या-नाले व शेती पाण्याने भरली. येथील जनजीवन विस्कळीत झाले असले, तरी शहरातील मुलांनी पावसात भिजण्याचा मनसोक्त आनंद देखील लुटला. (छायाचित्रः राजेश डांगळे)








































## झाड कोसळल्याने वाहतूक ठप्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खांडस गावाजवळ शनिवारी (दि.५) सकाळच्या सुमारास एक मोठे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या घटनेमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. झाड रस्त्यावर पडल्यामुळे अवजड वाहने तसेच चारचाकी वाहनांची वाहतूक पूर्णतः बंद झाली होती. तर, काही दुचाकीस्वार मात्र बाजूच्या अरुंद मार्गाचा वापर करून प्रवास करत होते. तसेच, खांडसवरून आंबेरपाडा व काठेवाडी या गावांकडे जाणाऱ्या नागरिकांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागला. दरम्यान, नांदगाव मार्गे आंबेरपाडा व काठेवाडी असा वळसा घालून प्रवास करावा लागल्याने नागरिकांचा वेळ व खर्च दोन्ही वाढला. मुसळधार पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून, या घटनेमुळे स्थानिक नागरिकांना आणखी त्रास सहन करावा लागत आहे.

## नागोठण्यातील अंबा नदीला पूर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

गेल्या दोन-चार दिवसांपासून दुथडी भरून वाहणाऱ्या नागोठण्यातील अंबा नदीने शनिवारी (दि.४) सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यानंतर रात्री नागोठणे अंबा नदीच्या काठावरील सखल भागात पाणी शिरले. यावेळी रविवारी (दि.५) सकाळी नागोठण्यातील एस.टी. स्थानक, आठवडा बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक व बाजारपेठ, बंगले आळी, श्री मरिआई मंदिरा समोरील मिनिडोर रिक्षा स्टँड व श्री मरिआई मंदिर परिसर, नागोठणे कोळीवाडा, हॉटेल लेक व्ह्यू समोरील परिसरात पूराचे पाणी शिरले. या पुरामुळे अंबा नदीवरील ऐतिहासिक पुल पूर्णतः पाण्याखाली गेला होता. तसेच, नागोठणे रोहा मार्गावरील भिसे खिंडीत रात्री दरड कोसळली. जेसीबीच्या सहाय्याने रस्ता मोकळा करण्याचे काम सुरू करण्यात आले. तसेच, मुंबई गोवा महामार्गावरील सुकेळी, चिकणी, वाकण पाली मार्ग, नागोठणे येथील आयटीआय समोरील महामार्गावर पुराचे पाणी आल्याने महामार्ग बंद झाला आहे. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, नागोठणे शहरात पुराचे पाणी आल्याने काही ठिकाणचे ट्रान्सफॉर्मर पुराच्या पाण्यात बुडाले आहेत. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव वीजपुरवठा मध्यरात्री बंद करण्यात आला.



(छायाचित्रः महेश पवार)

## उरणमधील पाले गाव जलमय

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात शनिवारी (दि.४) सकाळपासून वाढलेल्या पावसाच्या जोरामुळे पाले गावातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले होते. या पुराच्या पाण्याचा फटका मुख्य रस्त्यावर असलेल्या पुलाच्या कामाचे रुंदीकरण न केल्यामुळे बसला आहे. संबंधित प्रशासनाच्या व ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पुराच्या पाण्याचे संकट ओढावले असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, गावातील तरुणाईने पुराच्या पाण्यामुळे नदीचे स्वरूप प्राप्त झालेल्या पाण्यात होडी चालवून मनसोक्त जलविहाराचा आनंद घेतला. मात्र, येथील नागरिकांच्या घरातील चीज वस्तूंचे व संसार उपयोगी सामानाचे मोठ्या प्रमाणात



नुकसान झाले असल्याची माहिती माजी सरपंच वैभवी नंदकुमार म्हात्रे यांनी दिली. या गावावरून कोप्रोली ते आवरे असा नागरिकांच्या रहदारीचा मुख्य मार्ग गेला आहे. या मार्गाचे काम येथील स्थानिक ठेकेदारांनी केले आहे. मात्र, या रस्त्यावरील पाणी जाण्याचा साकाव पुल हा अरुंद असल्यामुळे येथील डोंगर माथ्यावरून पावसाळ्यात येणाऱ्या नैसर्गिक झऱ्याच्या पाण्याचा या अरुंद साकावामधून व्यवस्थितरित्या निचरा होत नाही. त्यामुळे परिसरातील सखल भागात पाणी तुंबून हे पुराचे पाणी गावातील नागरिकांच्या घरामध्ये घुसले आहे.

## आठ प्रवाशांची सुखरूप सुटका

**। आपटा । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या व नाले दुथडी भरून वाहत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत रविवारी (दि.५) रसायनीतील सारसई येथे कर्जत-पेण मार्गावरील एसटी बस पाताळगंगा नदीच्या वाढलेल्या पाण्यामुळे पुराच्या पाण्यात अडकली होती. या बसमधून एकूण ८ प्रवासी प्रवास करीत होते. रसायनीचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी धाडसाने बचावकार्य सुरू केले. या कार्यात हेल्प फाऊंडेशन रसायनीच्या सदस्यांनीही पोलिसांना मोलाचे सहकार्य केले. त्यांनी सर्व ८ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

## उल्हास नदी काठोकाठ भरली



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

गेले तीन दिवस पावसाने जिल्ह्याला झोडपून टाकले आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातून वाहणारी उल्हास नदी काठोकाठ भरून वाहत आहे. कर्जत तालुक्यात दि.२२ आणि २३ जून रोजी सुरू झालेला पाऊस त्यानंतर लगेचच गायब झाला होता. त्यानंतर शेतकरी आपल्या शेतातील भाताची रोपं जगण्याआधीच सुकून जाणार या चिंतेत सापडली होती. आता पुन्हा मुसळधार पाऊस सुरू झाल्याने बळीराजा देखील खुश झाला आहे. परंतु, सततच्या पावसामुळे कर्जतकरांवर घराबाहेर पडण्याची अडचण निर्माण झाली आहे. तालुक्यात उगम पावलेली चिल्लार नदी आणि पेज नदीला पूर आला आहे. तर, बोर घाटात उगम पावणारी उल्हास नदी देखील काठोकाठ भरून वाहत आहे. उल्हास नदीची कर्जत येथील जलसंपदा विभागाच्या बंधाऱ्यातील धोक्याची पातळी ही ४५ मीटर एवढी आहे. सध्या उल्हास नदीच्या पाण्याची पातळी ४३ मीटर पर्यंत गेली होती. त्यामुळे उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)